सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र राज्याचा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के

## कोकण विभागाचा सर्वाधिक तर लातूरचा सर्वात कमी निकाल

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावी परीक्षेचा राज्याचा निकाल जाहीर केला आहे. राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय.टी.आय. या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व उत्तीर्णतेची महाराष्ट्राची टक्केवारी ९१.८८ आहे.बारावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा कोकणचा निकाल ९६.७४ टक्के सर्वाधिक लागला आहे. तर लातूर ८९.४६ टक्के निकाल सर्वात कमी लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला आहे. बोर्डाकडून सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद घेऊन निकालाबाबतची माहिती देण्यात येणार आली. आज दुपारी एक वाजल्यापासून विद्यार्थ्यांना निकाल ऑनलाईन पाहता येणार आहे.

राज्यात बारावीच्या परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ दरम्यान झाल्या होत्या. एकूण ३ हजार ३७३ केंद्रांवर परीक्षा घेण्यात आल्या. त्यापैकी १२४ केंद्राची चौकशी होणार आहे. कारण या केंद्रांवर गैरप्रकार आढळला होता. या चौकशी दरम्यान त्रुटी आढळल्यास १२४ परीक्षा केंद्र केंद्र कायमस्वरूपी बंद करणार असल्याचं शिक्षण मंडळाने स्पष्ट केलं आहे.

यंदाच्या निकालात १०० टक्के गुण एकाही विद्यार्थ्याला मिळाले नाहीत. १ हजार ९२९ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर ४ हजार ५६२ महाविद्यालयांचा निकाल ९० ते ९९.९९ टक्के दरम्यान आहे. तर ३८ महाविद्यालयांचा निकाल शून्य टक्के लागला आहे.

निकालात ६ लाख २५ हजार ९०१ मुली, तर ६ लाख ७६ हजार ९७२ मुले उत्तीर्ण झाली. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के, तर मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी राज्य मंडळात झालेल्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाचे सचिव देविदास कुलाळ या वेळी उपस्थित होते. नोंदणी केलेल्या १४ लाख २७ हजार ८५ नियमित विद्यार्थ्यांपैकी १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यापैकी १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातील १ लाख ४९ हजार ९३२ विद्यार्थ्यांना ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले.



### विभागनिहाय निकाल २०२५

| | |
|---|---|
| कोकण | -९६.७४ |
| कोल्हापूर | ९३.६४ |
| मुंबई | ९२.९३ |
| संभाजीनगर | ९२.२४ |
| अमरावती | ९१.४३ |
| पुणे | -९१.३२ |
| नाशिक | -९१.३१ |
| नागपूर | ९०.५२ |
| लातूर | ८९.४६ |

शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेचा ९७.३५ टक्के, कला शाखेचा ८०.५२ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.६८ टक्के, व्यवसाय अभ्यासक्रमाचा ८३.२६ टक्के, आयटीआयचा निकाल ८२.०३ टक्के लागला.

## भारताच्या संरक्षण वेबसाईट्सवर पाकिस्तानकडून सायबर हल्ला, महत्त्वपूर्ण गोपनीय माहिती लीक झाल्याचा संशय

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- गेल्या महिन्यात जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध कमालीचे तणावपूर्ण बनलेले आहेत. यादरम्यान, दोन्ही देशांकडून आपल्या लष्करी बळाची चाचपणी सुरू आहे. त्यातच कुरापतखोर पाकिस्तानने आता भारतावर सायबर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानमधील हॅकर्सनी भारताच्या संरक्षण दलाशी संबंधित काही संकेतस्थळांना लक्ष्य केलं आहे. भारतीय लष्कराने दिलेल्या माहितीनुसार भारताच्या काही महत्त्वपूर्ण संरक्षण संकेतस्थळांना लक्ष्य करण्यात आलं असून, संरक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची गोपनीय माहिती लीक झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

लष्कराकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार पाकिस्तान सायबर फोर्स नावाच्या एका एक्स हँडलने मिलिट्री इंजिनियर सर्व्हिसेस (एमईएस) आणि मनोहर पर्रिकर संरक्षण अध्ययन आणि विश्लेषण संस्था (आयडीएसए) यांच्या डाटामध्ये घुसखोरी केली आहे. या सायबर हल्ल्यात संरक्षण कर्मचाऱ्यांचे लॉगिन क्रेडेंशिल्ससह बरीचशी गोपनीय माहिती लीक झाली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे.

याशिवाय पाकिस्तान हॅकर्स ग्रुपने संरक्षण मंत्रालयाच्या अधीन असलेल्या आर्म्ड व्हेईकल निगम लिमिटेड च्या अधिकृत संकेतस्थळाचं नुकसान करण्याचाही प्रयत्न केला. या संकेतस्थळाला पाकिस्तानचा झेंडा आणि एआयच्या मदतीने विद्रुप करण्यात आले.

भारतीय लष्कराने सांगितले की, खबरदारीचा उपास म्हणून आर्म्ड व्हेईकल निगम लिमिटेडच्या संकेतस्थळाला सध्यातरी तात्पुरतं बंद करण्यात आलं आहे. आता या संकेतस्थळाची पूर्ण तपासणी करून हॅकर्सनी त्याचं किती नुकसान केलं, याचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच या संकेतस्थळाची सुरक्षितता कायम राहावी, यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत.

# वक्फ प्रकरणी आता सर्वोच्च न्यायालयात १५ मे ला सुनावणी

## खटला न्या. गवईंच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडे वर्ग

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- वक्फ (दुरुस्ती) कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी आज (दि. ५ मे) सर्वोच्च न्यायालयाने पुढे ढकलली. आता या प्रकरणाची सुनावणी १५ मे रोजी न्यायमूर्ती बीआर गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर होईल, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होत आहेत. बीआर गवई हे देशाचे पुढील सरन्यायाधीश असतील.

आजच्या सुनावणीच्या प्रारंभी सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या निवृत्तीवर भाष्य केले. ते म्हणाले, तुमचे निवृत्त होणे हे आमच्यासाठी वेदनादायक आहे. आम्हाला तुमच्यासमोर या प्रकरणाचा पाठपुरावा करायला आवडले असते. कारण प्रत्येक वादाचे उत्तर असते.



यावर सरन्यायाधीशांनी स्पष्ट केली की, मी निवृत्तीच्या दिवसाची वाट पाहत आहेत. तुम्ही पुढील बुधवारी न्यायमूर्ती बीआर गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर हे मत नोंदवा.

सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सर्वोच्च न्यायालयात वक्फ सुधारणा कायद्याचा खटला न्यायमूर्ती गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडे वर्ग केला आहे. आता या प्रकरणाची सुनावणी १५ मे रोजी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात १७ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीवेळी केंद्राने आश्वासन दिले होते की, ५ मे पर्यंत न्यायालयाने वक्फ म्हणून जाहीर केलेल्या मालमत्तांची स्थिती 'जैसे थे' राहणार. म्हणजेच त्यांना अवैध घोषित केले जाणार नाही. पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड आणि परिषदेवर बिगर मुस्लीमांची नियुक्ती नाही, असे म्हटले होते. केंद्र सरकारतर्फे उपस्थित असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाला माहिती देताना संसदेने ''योग्य विचारविनिमय करून'' मंजूर केलेला कायदा सरकारचे म्हणणे ऐकल्याशिवाय स्थगित केला जाऊ नये, असे म्हटले होते.

वक्फ कायदा कायम ठेवावा, २०१३ च्या दुरुस्तीला स्थगिती नाकारावी अशी विनंती मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात मागील सुनावणीवेळी केली होती. केंद्र सरकारने वक्फ दुरुस्तीचा धर्मनिरपेक्ष कायदा म्हणून बचाव केला आहे, धार्मिक हस्तक्षेप दावे फेटाळले आहेत. अनेक वक्फ दुरुस्ती कायदा आव्हान याचिकांमधून केवळ पाच प्रमुख याचिका न्यायालयाने सुनावणीसाठी निवडल्या होत्या.

## पाकिस्तान हादरला, ४.२ रिश्टर स्केलचा भूकंप

नवी दिल्ली दि.५ (प्रतिनिधी)- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून दोन्ही देशाच्या सीमारेषेवर तणावाचे वातावरण आहे. त्यातच, पाकिस्तानमध्ये ४.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाल्याची माहिती समोर आली आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी ४ वाजता पाकिस्तानात भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. एकीकडे भारताकडून घेण्यात येत असलेल्या निर्णयांमुळे पाकिस्तानमध्ये तणावपूर्ण शांतता असताना निसर्गानेच आता पाकिस्तानला धक्का दिलाय.

४.२ तीव्रतेचा भूकंप हा सौम्य श्रेणीत मोडतो, ज्यामुळे सामान्यतः मोठ्या प्रमाणात नुकसान होत नाही. त्यामुळे काही ठिकाणी किरकोळ धक्के जाणवू शकतात, परंतु जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता कमी असते. अद्याप या भूकंपामुळे कोणतेही नुकसान किंवा जीवितहानी झाल्याची माहिती नाही. दरम्यान, यापूर्वी, ३० एप्रिल २०२५ ला ४.४ तीव्रतेचा आणि १२ एप्रिल २०२५ ला ५.८ तीव्रतेचा भूकंप पाकिस्तानात झाला होता, ज्यामुळे काही ठिकाणी धक्के जाणवले होते.

## सोयगाव; संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा १२ वीचा ९६.९५ % टक्के निकाल

सोयगाव दि.५ (प्रतिनिधी)- येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा कला,वाणिज्य,विज्ञान व एम.सी.व्ही.सी. या शाखेचा मिळून ९६.९५% निकाल लागला आहे. एकूण २९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती,त्यापैकी २८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.महाविद्यालयात सर्वाधिक यांची विषयी एम.सी.व्ही.सी.शाखेचा १००% टक्के निकाल लागला असून त्यानंतर विज्ञान शाखेचा ९९.२६, कला शाखेचा ९५.२९ तर वाणिज्य शाखेचा ९२.९८% निकाल लागला आहे.

महाविद्यालयात विज्ञान शाखेमध्ये आर्यन उल्हास पाटील ८७.५०% मिळवून प्रथम आला आहे तर दिव्या कैलास पाटील ८५.६७% गुणासह द्वितीय,सर्वेशा भास्कर पाटील ८५.३३% टक्क्यासह तृतीय क्रमांक मिळाला आहे. कला शाखेत नंदिनी राहुल बि-हारे ७७.१७ % मिळवून प्रथम,दिव्या अतुल सोनवणे ७४.६७% द्वितीय तर अश्विनी कैलास साळवे ७२.५०% तृतीय आली आहे.

वाणिज्य शाखेत प्रिया लक्ष्मीकांत पवार ७२.३३% प्रथम,गायत्री बाबू चौधरी ६९.३३% द्वितीय तर निखिल पद्माकर पाटील ६९.००% तृतीय आला आहे. एमसीव्हीसी शाखेतून अश्विनी रवींद्र मापारी ७४.००% प्रथम, रूपाली नागराज शेलार ७२.५०% द्वितीय तर सुमित गोकुळ राठोड ७०.००% तृतीय क्रमांक मिळाला आहे.

सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कनिष्ठ विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील,केंद्र संचालक प्रा.भागवत महालपुरे,डॉ.सुभाष पाटील,प्रा.भारती पाटील,प्रा.स्वाती चव्हाण,प्रा.शंकर कानडे,प्रा.विनोद चव्हाण,प्रा.ए.ए.शेख,प्रा. रवींद्र जाधव,प्रा.अनिल मानकर,प्रा. दिपक लिंबे,प्रा.दिपक कल्याणकर,डॉ. निलेश गाडेकर,प्रा.कमलेश काळे,प्रा. संदीप निकम,प्रा.उदय सोनवणे,यांच्या सह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सत्ताधाऱ्यांचे मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष; रोहित पवार यांचा आरोप

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- लाडक्या बहिणींसाठी योजना आणि छोट्या-मोठ्या नेत्यांना विकत घेऊन तसेच गुंडांना हाताशी धरून महायुतीने सत्ता मिळवली आहे. सत्ता आल्यानंतर राज्यातील मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीका कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी राजगुरुनगर येथे महायुतीच्या सरकारवर केली.

आमदार रोहित पवार हे एका परिवाराला भेट देण्यासाठी राजगुरुनगर येथे आले होते. या वेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ॲड. गणेश सांडभोर व ॲड. बी. एम. सांडभोर यांनी आमदार पवार यांचे स्वागत केले.

या वेळी आमदार पवार म्हणाले, पाणी, वीज, आरोग्य, रस्ते या प्रश्नांकडे सरकार लक्ष देत नाही. नोकर्यांसाठी कोणी आंदोलन करीत नाही. लाडक्या बहिणींना पैसे मिळत नाहीत, त्यासाठीही कोणी आंदोलन करीत नाहीत. राज्यातील जनतेचा जीवन मरणाचा प्रश्न असताना त्याकडे सरकारचे लक्ष नाही. मात्र, मुद्दामहून हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करून त्याकडे लक्ष वेधले जात आहे.

आ. पवार पुढे म्हणाले, महिलांवर होणार्या अत्याचारात महाराष्ट्र राज्य आघाडीवर गेले आहे. पुणे जिल्ह्यात दररोज २० मुली, महिला बेपत्ता होत आहेत. केवळ पुणे शहरात वर्षभरात ६५० महिलांवर बलात्कार आणि ८५० विनयभंगाच्या तक्रारी झाल्या आहेत. ग्रामीण आणि राज्यात त्याचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्राचा बिहार होतो आहे, असे आ. पवार म्हणाले.

## मुख्यमंत्र्यांसह अर्थमंत्र्यांवर ॲट्रोसिटीचे गुन्हे दाखल करा-ओबीसी नेते लक्ष्मण हाके

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एससी आणि एसटी या प्रवर्गासाठी दिला जाणारा निधी वळविण्यात आला आहे. हा निधी मुख्यमंत्र्यांच्या सुचनेप्रमाणे वर्ग केल्याचे वक्तव्य अर्थमंत्री करीत असतील तर या दोघांवर ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पत्रकार परिषदेत केली.

याबाबत बोलताना हाके म्हणाले, सामाजिक न्याय विभागाला निधी मिळत नाही, अशी वक्तव्ये त्याच विभागाचे मंत्री संजय शिरसाट करीत असतील तर ते या विभागाला न्याय देऊ शकणार नाहीत. त्यांनी त्वरीत आपल्या मंत्री पदाचा राजीनामा द्यावा. त्याचबरोबर गेली वर्षोनुवर्षे अजित पवारच अर्थमंत्री होत आहेत. स्वतः कडे अर्थखाते ठेवण्यात त्यांना अधिक रस असेल तर त्यांनी सर्वांना समान न्याय द्यावा. शासनाकडून नवनवीन योजना आणत असताना सामाजिक न्याय विभागाचा निधी वर्ग करणे चुकीचे आहे. अर्थमंत्र्यांनी सहकार विभागाचा निधी विविध योजनांसाठी वर्ग करावा. मात्र, त्यांनी सामाजिक न्याय विभागावरच अन्याय केला आहे.

शासनाच्या वतीने अहिल्यादेवी यांच्या जन्मगाव चौंडी येथे कॅबिनेटची बैठक आयोजित केली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु, तेथे केवळ मागील फाईलवर सह्या करण्याऐवजी त्या कॅबिनेटमध्ये अहिल्यादेवी यांच्या नावाने प्रत्येक जिल्हापातळीवर मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारावे तसेच त्यासाठी लागणारा निधी ही मंजुर करावा, अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी यावेळी केली.

मनोज जरांगे हे अर्धवट माहितीवर काहीही बरळत असतात. धनगर समाज हा ओबीसी मधीलच घटक आहे. ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण मिळत असून त्यातील ३.५ टक्के आरक्षण हे केवळ धनगर समाजाला मिळत आहे. सर्वात जास्त आरक्षणाचा फायदा हा धनगर समाजाला ओबीसी आरक्षणातून होत असतो. त्यामुळे मनोज जरांगे यांनी आधी कायद्याचा अभ्यास करावा मगच वक्तव्ये करावीत, असा सल्ला लक्ष्मण हाके यांनी यावेळी दिला.

शासनाकडून सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एससी प्रवर्गासाठी ४१० कोटी तर एसटी प्रवर्गासाठी ३५०.५० कोटी रुपये असा एकुण ७४६ कोटी रुपयांचा विधी वर्ग केला आहे. या सर्वाची जबाबदारी अर्थमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्यावर ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ही हाके यांनी यावेळी केली.

## आळंदी देवस्थानला ज्ञानेश्वरीच्या प्रति छपाईसाठी एक कोटी रुपये-उदय सामंत

आळंदी दि.५ (प्रतिनिधी)- संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी अर्थात आळंदी देवस्थानला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रती छपाईसाठी एक कोटी रुपये देणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आळंदी येथे केली.

याबरोबरच इंद्रायणी प्रदूषणात मुक्ती बाबत करण्यात आलेला लोणावळा ते तुळापूर पर्यंतचा संपूर्ण आराखडा एमआयडीसी मार्फत राबविला जाणार आहे आणि त्याच खात्याचा मी मंत्री असल्याने हे पुण्याचे काम माझ्या हातून होणार असल्याचे देखील सामंत यांनी यावेळी सांगितले.

श्रीक्षेत्र आळंदी येथे सुरु असलेल्या संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याला सामंत यांनी भेट दिली.यावेळी त्यांनी भाविकांना संबोधित करत शासनाच्या निर्णयाची माहिती दिली. माऊलींच्या ज्ञानेश्वरी मुळेच मराठी भाषेला अभिजात दर्जा सिद्ध करणे शासनाला सोपे गेल्याचे सामंत यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. राज्यभरात विविध जिल्ह्यात माऊलींच्या जन्मोत्सवानिमित्ताने कीर्तन सप्ताह आयोजित करण्याबाबत यजमानपद स्वीकारण्याचा देखील त्यांनी यावेळी प्रस्ताव ठेवला.

## रशियाचे अध्यक्ष पुतीन यांचा नरेंद्र मोदींना फोन, पहलगाम हल्ल्याचा निषेध, भारताला फुल्ल पाठिंबा!

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानविरोधात पाठिंबा मिळवायला सुरुवात केली असून त्यामध्ये आता रशियाचाही समावेश झाला आहे. दहशतवादाविरोधात लढण्यासाठी रशियाने भारताला पाठिंबा जाहीर केला असून त्यामुळे भारताच्या लढ्याला आता मोठं बळ मिळालं आहे. रशियाचे अध्यक्ष ब्दादिमीर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करुन पहलगाम हल्ल्याचा निषेध नोंदवला. नरेंद्र मोदींना पहलगामनंतर फोन करणारे रशियाचे पुतिन हे १८ वे जागतिक नेते आहेत.

भारतातील दहशतवादी हल्ल्यामध्ये जे कुणी सामील असतील त्यांना कठोर शिक्षा मिळावी असं मत पुतीन यांनी व्यक्त केलं. दहशतवाद तसेच इतर अनेक गोष्टींवर भारत आणि रशिया एकत्र मिळून काम करतील असा विश्वासही पुतीन यांनी मोदींना दिला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिचाच्या ८० व्या स्थापना दिवसाच्या पुतीन यांना शुभेच्छा दिल्या.

या वर्षाच्या शेवटी भारतात शिखर संम्मेलन होणार असून त्यासाठी नरेंद्र मोदी यांनी रशियाच्या पुतीन यांना आमंत्रण दिलं आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने रशिया -युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर वॉरंट जारी केल्यानंतर पहिल्यांदाच पुतिन भारतात येणार आहेत. या आधी भारतात झालेल्या जी २० परिषदेला पुतिन अनुपस्थित राहिले होते. नरेंद्र मोदींनी स्वतःच पुतिन यांना भारतात येण्याचे निमंत्रण दिले आहे.

सातत्याने युद्धाची भाषा करत भारताविरुद्ध गरळ ओकणाऱ्या पाकिस्तानला भारताने आपल्या कृतीतून उत्तर दिलं आहे. भारताने थेट आपल्या संरक्षण क्षमतेत वाढ करत, पाकिस्तानचे दात घशात घातले. भारताला रशियाकडून अत्याधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्रे मिळाली आहेत. त्यामुळे शत्रूची लढाऊ विमाने, ड्रोन आणि हल्ला करणारे हेलिकॉप्टर अगदी जवळून पाडणं शक्य होणार आहे.

भारतीय सैन्याने ही इग्ला-एस क्षेपणास्त्र पश्चिम सीमेवर तैनात केले आहेत. भारताने रशियासोबत केलेल्या २६० कोटी रुपयांच्या विशेष खरेदी करारांतर्गत ही क्षेपणास्त्रे पुरवण्यात आली आहेत. ही क्षेपणास्त्रे आता सीमांवर तैनात केली जात असल्याने पाकिस्तानसोबत तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्कराची क्षेपणास्त्र क्षमता आणखी मजबूत झाली आहे. इग्ला-एस ही १९९० च्या दशकापासून वापरात असलेल्या इग्ला क्षेपणास्त्रांची प्रगत आवृत्ती आहे. या क्षेपणास्त्रांची खरेदी केंद्र सरकारच्या आपत्कालीन खरेदी अधिकारांतर्गत करण्यात आली आहे.

दोनच दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी रशियाकडे मदतीची याचना केली होती. भारताने घेतलेल्या आक्रमक भूमिकेविरोधात पाकिस्तानला पाठिंबा द्यावा अशी मागणी त्यांनी पुतीन यांच्याकडे केली होती. पण रशियाने पाकिस्तानच्या मागणीला कोणतीही भीक घातली नाही. त्याउलट रशियाने भारताच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानसमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने रूद्रावतार धारण केल्यावर आता पाकिस्तानची पाचावर धारण बसल्याचं दिसतंय. घाबरलेल्या पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांनी तातडीने संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं. दुसरीकडे पाकिस्तानी नेतृत्वाने जगभरात पदर पसरला. अमेरिका, तुर्कस्तान, रशियासह इस्लामी देशांच्या संघटनेला पाकिस्तानने साकडं घातलं आहे. तसंच संयुक्त राष्ट्रांकडे सवयीनुसार जात भारताला रोखा असं आवाहन केलं.

एकीकडे पाकिस्तान जगभर मदतीची भीक मागतोय, तर दुसरीकडे पाकिस्तानी नेत्यांची बडबड काही थांबत नाहीय. पाकिस्तानी नेत्यांकडून अणुहल्ल्याच्या धमक्या सुरूच आहेत.

## अंबाजोगाईत विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ मे**

अंबाजोगाई शहरासह परिसरात सोमवारी दुपारी ५ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह गारांच्या पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून अंबाजोगाईतील प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, सोमवारी आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

आज दिनांक ५ मे रोजी दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई परिसराला गारांच्या पावसाने झोडपले. अचानक आलेल्या पावसामुळे अंबा पिकांचे नुकसान झाले आहे. नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

## बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन यामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.०८ टक्के, कला शाखेचा ८२.९० टक्के, वाणिज्य शाखेचा ९५.१५टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ९५.५२टक्के निकाल लागला आहे तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ९२.६५टक्के लागला आहे.

बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम सोळंके सिद्धी गोरखनाथ (९०.६७%), द्वितीय गायकवाड संस्कृती सखाराम (८९.८३%), तृतीय तरटे निशा संजय (८९.८३%) कला शाखातुन प्रथम भुंगासे दत्तात्रय अंबादास (८३.६७%),द्वितीय वाशिंबे नीता महादेव (८१.६७%),तृतीय गायकवाड सिद्धार्थ यादव (७९.६७%) वाणिज्य शाखा प्रथम गारगे नंदिनी नारायण (९०.३३%), द्वितीय खेत्रे ओंकार देवानंद (८४ %),तृतीय फपाळ वैजिनाथ गोपीनाथ (८४%) व्यावसायिक अभ्यासक्रम प्रथम मोरे सुरेखा चंद्रकांत (८२.१७%), द्वितीय आगे अंकुश श्रीराम (७९.३३%), तृतीय डोरमारे श्रीकृष्ण तात्याबा ( ७१.०%) यांनी यश संपादन केले.बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ऍड.भानुदासराव डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण,प्राचार्य डॉ.जी. के.सानप, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधिक्षक सतीश एरंडे यांनी अभिनंदन केले.


# आमदार प्रकाश सोळंके धारूर दौऱ्यावर; अनेक वर्षांपासून प्रलंबित समस्या सुटणार का?

**सूर्यकांत जगताप**
**किल्ले धारूर**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके धारूर शहराच्या दौऱ्यावर आहेत. निवडणूक संपल्यानंतर ते प्रथमच धारूर शहरात येत असल्याने नागरिकांमध्ये त्यांच्या दौऱ्याविषयी मोठी उत्सुकता आहे. ग्रामीण रुग्णालयातील भव्य आरोग्य शिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. मात्र, या दौऱ्यादरम्यान आमदार सोळंके धारूर शहराच्या आणि तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित समस्यांकडे लक्ष देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

प्रलंबित समस्यांचा डोंगर:

धारूर शहरातील नागरिकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत.धारूरचा घाट रुंदीकरण प्रतीक्षेत आहे. ग्रामीण रुग्णालयाकडे जाणारा रस्ता गेल्या सहा-सात वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. तसेच, गोपाळपूर रस्त्यावरील वाहतूक बंद करून ग्रामीण रुग्णालयाकडे जाणारा रस्ता नगर परिषदेच्या अंतर्गत करण्याची मागणीही एक वर्षापासून प्रलंबित आहे. रुग्णालयात पाण्याची सोय नसल्याने कर्मचारी आणि रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पंचायत समिती, कृषी कार्यालय, भूमी अभिलेख, वन विभाग आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी वेळेवर येत नसल्याने नागरिकांची कामे रखडली आहेत.



पाणीटंचाई आणि शिक्षण विभागाची दुरवस्था:

किल्ले धारूर शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या आहे. तांदळवाडी, धनेगाव आणि साठवण तलावातून पर्यायी व्यवस्था करूनही पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही. कुंडलिकाचे पाणी लवकर मिळावे, अशी नागरिकांची मागणी आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होत आहे. अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याची मागणी जोर धरत आहे.

इतर समस्या:

पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम पूर्ण होऊनही त्याचे उद्घाटन रखडले आहे. पोस्टाच्या शासकीय जागेवर बांधकाम करण्याची मागणीही अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. बाजारपेठेतील नाली आणि रस्त्याच्या कामाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. आगारामध्ये जुन्या बस असल्याने प्रवाशांना त्रास होत आहे. नवीन बस आणि बसस्थानकाची मागणीही प्रलंबित आहे. शेतकऱ्यांना केवळ दोन तास वीज मिळत असल्याने ते त्रस्त आहेत. क्रीडा अधिकारी नसल्याने खेळाडूंचे नुकसान होत आहे.दारू शहरात वाचनालयाची सोय असावी.बगीचा उपलब्ध असावा. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई जाणवत आहे. महादुर्ग किल्ल्याला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

आमदारांकडून अपेक्षा:

आमदार प्रकाश सोळंके यांनी या सर्व समस्यांकडे लक्ष देऊन त्यांचे निराकरण करावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. त्यांनी महिन्यातून एक वेळा जनता दरबार घेऊन नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशीही मागणी होत आहे. धारूर शहरातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी रुग्णालयात पुरेसे कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

आमदार सोळंके यांच्या आजच्या दौऱ्यात या समस्यांवर काय तोडगा निघतो, याकडे धारूर शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## केज तालुक्यातील ६०% शेतकरी पीकविम्यापासून वंचित


### शेतकऱ्यांत 'कहीं खुशी कहीं गम'
### सरसकट पीक विमा देण्याची होतेय मागणी

तभा वृत्तसेवा केज/ अनिल गलांडे

केज तालुक्यात २०२४ मधील खरीप हंगामात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने प्रत्येक शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूसा सह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.त्यावेळी झालेल्या पीक नुकसानीची विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार अर्ज देणाऱ्या देणाऱ्या शेतकऱ्यांनाच पीक रक्कम विमा कंपनीकडून देण्यात येत आहे. अतिवृष्टीने व सततच्या पावसाने पिकाचे नुकसान होऊनही ऑनलाइन तक्रार दाखल न करणाऱ्या अर्जाचे प्रमाण तब्बल

६०% आहे.परिणामी निम्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना पीक विम्यापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांत 'कहीं खुशी कहीं गम' दिसून येत असून राहिलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा विमा कंपनीने पिक विमा देऊन आर्थिक आधार द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटांमुळे दरवर्षी शेतकरी नुकसान सोसत असून, प्रत्येकवेळी त्याच्या पदरी निराशाच येत आहे.



सातत्याने आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस बिकट झाली आहे.या स्थितीतून शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लावण्यासाठी त्यांच्या पिकाला आर्थिक संरक्षण देण्यासाठी प्रधानमंत्री पीकविमा योजना सुरू करण्यात आली. मात्र, योग्यवेळी व नुकसानाच्या प्रमाणात शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम मिळत नसल्याने योजनेचा हेतू साध्य होताना दिसत नाही.

खरीप २०२४ मध्ये पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी २ लाख २२ हजार ६९० पीक विमा अर्ज दाखल करत १ लाख १० हजार ३६५ हेक्टर जमीनीवरील पिके विमा संरक्षित केली. सर्वाधिक विमा हा सोयाबीन पिकावर उतरण्यात आला होता. गत वर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले त्या नुकसानीची ऑनलाइन तक्रार अर्ज विमा कंपनीकडे केलेले ९० हजार २८ अर्ज विमा भरपाईसाठी पात्र ठरले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचे अर्ज विविध कारणांमुळे फेटाळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.केज तालुक्यातील पीक नुकसानभरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ४१ कोटी ५९ लाख ६० हजार ६८८ रुपयांची विमा रक्कम मिळणार आहे.तसेच पीक नुकसान भरपाईस पात्र ठरलेले बहुतांश शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. विमा लाभधारक शेतकरी समाधान व्यक्त करत असले तरी तालुक्यातील निम्म्यापेक्षा जास्त शेतकरी विम्याच्या प्रतीक्षेत आहेत. पीक विम्याच्या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन राहिलेल्या शेतकऱ्यांना पीक विमा मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

या कारणामुळे राहिले शेतकरी पिक पीकविम्यापासून वंचित

नैसर्गिक अथवा स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासाच्या आत पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार दाखल करावा लागतो हे शेतकऱ्यांना माहितीच नाही

अनेक शेतकरी अजूनही स्मार्टफोन वापरत नाहीत.

आजही अनेक ठिकाणी कुठल्याही कंपनीचे नेटवर्क नाही.

तक्रार करण्याचा प्रयत्न करताना विमा कंपनीचे वेबसाईट/ प चालली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कृषी विभागाकडुन वेळोवेळी मार्गदर्शनाचा अभाव.

ई-पीक पाहणी आणि पीक नुकसानीची विमा कंपनीकडे तक्रार या दोन बाबी वेगवेगळ्या आहेत परंतु शेतकरी दोन्ही एकच समजत असल्याने शेतकऱ्यांची जमलिंग झाली. यासह अनेक कारणामुळे पिकांचे नुकसान होऊनही शेतकरी पिकांची ऑनलाईन तक्रार करू शकले नाहीत, त्यांना विमा रक्कमेस मुकावे लागत आहे.

विमा अर्ज व इतर विवरण

शेतकऱ्यांचे एकूण विमा अर्ज-:२,२२,६९०

एकूण जमीन क्षेत्र -:१,१४,८४६ (हेक्टर)

विमा संरक्षित जमीन क्षेत्र-:१,१०,३६५ (हेक्टर)

एकूण पीक नुकसान तक्रार अर्ज -:९०,०२८ (हेच विमा रक्कमेस पात्र)

स्थानिक आपत्ती व काढणी पश्चात पीक नुकसानभरपाई विमा रक्कम -: ४१,५९,६०,६८८

## केजमधे NEET ची परीक्षा सुरळीतपणे पडली पार




**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ मे**


केज शहरातील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या शारदा ईंग्लिश स्कूल या नामांकित शाळेमध्ये यावर्षी पहील्यांदाच NEET २०२५ परिक्षा झाली. अत्यंत चोख पोलीस बंदोबस्तात ही परीक्षा सुरळीतपणे पार पडली.

मेडिकल क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची परीक्षा म्हणून छशशीं परीक्षेकडे सध्या अनेक विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर ओढा आहे. यामुळे या परीक्षेला प्रत्येक केंद्रावर तोबा गर्दी होत असते. यावर्षी पहिल्यांदाच केज शहरामध्ये देखील ही परीक्षा झाली. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या शारदा ईंग्लिश स्कूल या नामांकित शाळेमध्ये चोख पोलीस बंदोबस्तात ही परीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे. सुसज्ज, टोलेजंग इमारत आणि उत्तम नियोजन यामुळे या ठिकाणी ४८० विद्यार्थ्यांची परीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे. केज शहरामध्ये यावर्षी शारदा ईंग्लिश स्कूलमध्ये हे परीक्षा केंद्र आल्यामुळे या भागातील विद्यार्थी आणि पालकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## रक्षा मंत्रालयाने दिली योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सैनिकी शाळेला मंजूरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ मे**

स्वातंत्र्य पूर्व काळात स्वातंत्र्य चळवळ गतीमान करण्यासाठी या विभागातील मुलांना योग्य शिक्षण मिळावे हा पवित्र उद्देश डोळ्यासमोर ठेवून स्थापन करण्यात आलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेस केंद्रीय रक्षा मंत्रालयाने सैनिकी स्कुल सुरु करण्याची परवानगी दिली आहे.




केंद्र सरकारच्या रक्षा मंत्रालयाकडे मराठवाड्यातील ७० शिक्षण संस्थांनी सैनिकी शाळा सुरु करण्यासाठी रक्षा मंत्रालयाकडे परवानगी मागितली होती. अलिकडेच रक्षा मंत्रालयाच्या काही अधिकाऱ्यांनी या संदर्भात योगेश्वरी शिक्षण संस्था व मराठवाड्यातील इतर काही शिक्षण संस्थेस भेट देवून शाळा सुरु करण्यासंदर्भात चाचपणी केली होती.

साडेतीन एकर जागेत उभारणार शाळा !

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने या अधिका-यांना महात्मा जोतिबा फुले वसतिगृहाशेजारील मोकळी असलेल्या साडे तीन एकर जागा या नियोजित सैनिकी शाळा सुरु करण्यासाठी दाखवली होती.सदरील पाहणीस काही महिने पूर्ण झाल्यानंतर आज केंद्रीय रक्षा मंत्रालयाचे एक पत्र योगेश्वरी शिक्षण संस्थेस प्राप्त झाले आहे.

अंबाजोगाईत आनंद !

योगेश्वरी शिक्षण संस्था ही स्वातंत्र्य पूर्व काळात स्थापन झालेली शिक्षण संस्था असून अजूनही या शिक्षण संस्थेने आज पर्यंत आपल्या नितीमुल्यांशी कधीही तडजोड केली नाही. एक शिस्त प्रिय, विद्यार्थी घडवणारी संस्था म्हणूनच या संस्थेकडे आज ही आदरानेच पाहीले जाते. या संस्थेस सैनिकी शाळा सुरु करण्यासाठी रक्षा मंत्रालयाने परवानगी दिल्यास नंतर शहरातील मान्यवरांनी संस्थेचे अभिनंदन केले आहे.

## माल निघालाय पण भाव ढासळले



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ मे**

गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांचा कांदा उत्पादनाकडे कल वाढला आहे .त्यामुळे खरीप, रब्बी हंगामात कांद्याकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला असुन दोनही ऋतुत कांदा लागवड करत आहेत.कांदा उत्पादनात वाढ झाली परंतु कांद्याला सद्यपरिस्थितीत भाव नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. भर उन्हाळ्यात कांदा काटणीला मजुर मिळत नाहीत.त्यातच उन्हाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्यावर असताना शेतकरी कांदा काढणी करत आहेत. कांद्याला फेब्रुवारी मध्ये प्रति किलो २०-३० रूपये बाजारभाव होता. तो टिकुन राहिल असे वाटत असतानाच बाजारभाव कमी होऊन ११ रुपये किलोवर आला आहे. कांदा उत्पादक शेतकरी ढासळलेल्या भावामुळे चिंतेत असुन भाडे वाहतुक,बारदाणा, पिशव्या भरायला सुद्धा परवडेना अशी खंत बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलुन दाखवली.

## शेतकऱ्यास बेदम मारहाण; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ मे**

पिंपळगाव (ता. केज) येथील शेतकरी मच्छिंद्र मधुकर घोळवे हे सांगवी शिवारामध्ये शेत नामे कोळपट्टी शेतात पाणी देत असताना २ मे रोजी रात्री १२.३० वाजता अभिषेक काशीनाथ केदार हा आला. त्याने मध्यरात्री बारा वाजल्यापासुन माझी पाणी देण्यासाठी बारी येत आहे. असे म्हणाल्याने त्यास तुझी बारी आता पासून नाही, सकाळी येते असे म्हणाले असता त्याने शिवीगाळ करून डोक्यात दगड मारून डोके फोडले. तर तुळसाबाई काशिनाथ केदार, दादा काशिनाथ केदार, काशिनाथ एकनाथ केदार तिघांनी काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण करीत शिवीगाळ केली. पुन्हा या रानात आला, तर तुला जिवच मारतो अशी धमकी दिली. अशी तक्रार मच्छिंद्र घोळवे यांनी दिल्यावरून अभिषेक केदार, तुळसाबाई केदार, दादा केदार, काशिनाथ केदार (सर्व रा. सांगवी) या चौघांविरुद्ध केज ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार दत्तात्रय बिक्कड हे करीत आहेत.

## महिलेच्या पर्समधून लांबविले सोन्याचे दागिने

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ मे**

शहरातील धानोरा रोड,पिगळे विद्यालया समोरून जात असताना महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने अज्ञात चोरटयांनी लंपास केल्याची घटना (दि.१) गुरुवार रोजी घडली असून चोरटयांनी ९,३७,५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यात चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.त्यातच शहरातील धानोरा रोड,पिगळे विद्यालया समोरून जात असताना दिपाली दिपक पवार (वय ३२) रा. मनीषा हौशींग सोसायटी साने चौक,चिखली मोरे वस्ती ता.हवेली जि.पुणे यांच्या पर्समधून सोन्याचे दागिने अज्ञात चोरटयांनी लंपास केल्याची घटना घडली असून यामध्ये पावणे आठ तोळ्याचे गंठण अंदाजे किंमत ४,६५,००० रुपये,चार तोळ्याचा राणी हार अंदाजे किंमत २,७०,००० रुपये,दीड तोळ्याची अंगठी अंदाजे किंमत ९०,००० रुपये,पावणे आठ ग्रॅमची चैन अंदाजे किंमत ४६,५०० रुपये,११ ग्रॅमचे झुंबर अंदाजे किंमत ६६,००० रुपये असा एकूण ९,३७,५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.




## सीएमएफ फोन २ प्रो उपलब्ध

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीच्या सीएमएफ या सबब्रँडने त्यांच्या सीएमएफ फोन २ प्रोची विक्री ५ मे रोजी दुपारी १२ वाजल्यापासून फ्लिपकार्ट, फ्लिपकार्ट मिनिट्स, विजय सेल्स, क्रोमा आणि भारतातल्या सर्व आघाडीच्या रिटेल स्टोअर्समध्ये सुरू होणार असल्याची घोषणा केली आहे. पहिल्या दिवशी खास सादरीकरणाची ऑफर म्हणून फोन २ प्रो रु. १६,९९९ (सर्व ऑफर्ससहित) इतक्या कमी किमतीला उपलब्ध असणार आहे. सीएमएफ बाय नथिंगने २८ एप्रिल २०२५ रोजी फोन फोन २ प्रो जागतिक बाजारपेठेत सादर केला. या गटातील सर्वोत्तम कॅमेरा, अप्रितम ब्राइट डिस्प्ले आणि प्रीमिअम डिझाइन असलेला सीएमएफ फोन २ प्रो हा दैनंदिन वापरासाठीचा उत्कृष्ट स्मार्टफोन आहे.

## कल्की फॅशनने लाइटहाऊस फंड्ससह भागीदारी करून रचला नवा इतिहास

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- कल्की फॅशन, जो भारतातील प्रमुख अपॉर्च्युनिटीवेअर आणि ब्राइडल कुट्योर ब्रँड्सपैकी एक आहे, त्याने लाइटहाऊस फंड्ससोबत एक रचनात्मक गुंतवणूक भागीदारी केली आहे. हे सहकार्य ब्रँडच्या विस्ताराच्या दिशेने एक महत्त्वाचा पाऊल आहे. आठ फ्लॅगशिप स्टोअर्ससह, कल्की फॅशन आधीच प्रमुख महानगरीय बाजारांमध्ये आपली मजबूत उपस्थिती दाखवले आहे आणि आधुनिक ग्राहकांसाठी समकालीन भारतीय सिल्हूट्सची ओळख बनले आहे. लाइटहाऊस फंड्सजे ग्राहक ब्रँड्सना घराघरात ओळख मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध आहेतसोबत ही भागीदारी केवळ भांडवल गुंतवणूक नाही, तर कल्की फॅशनला जागतिक पातळीवर नेण्यासाठी एक सक्षम रचनात्मक पाऊल आहे.

## फोनपेतर्फे 'मेड इन इंडिया' स्मार्टस्पीकरचा नवा अवतार सादर

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- फोनेपे या भारतातील आघाडीच्या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म ने आज आपल्या नव्या जनरेशन 'स्मार्टस्पीकर'चे अनावरण केले. व्यापार्यांच्या वाढत्या गरजांनुसार खास डिझाइन केलेले हे अपग्रेडेड डिव्हाइस पूर्णतः भारतात तयार करण्यात आले आहे. ओरिजिनल स्मार्टस्पीकरचे लोकप्रिय फीचर्स कायम ठेवत, या नव्या व्हर्जनमध्ये अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या लॉँच प्रसंगी, फोनपेच्या मर्चंट बिझनेस विभागाचे चीफ बिझनेस ऑफिसर युवराजसिंह शेखावत म्हणाले, ''आमचे नवीन जनरेशनचे मेड इन इंडिया स्मार्टस्पीकर्स सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.. देशांतर्गत उत्पादनामुळे आम्हाला आमच्या व्यापाऱ्यांच्या गरजांनुसार उत्पादने अधिक स्मार्ट पध्द्तीने तयार करता येतात. या स्मार्टस्पीकर्सच्या माध्यमातून आम्ही देशभरातील व्यापाऱ्यांसाठी आर्थिक समावेशन घडवून आणत आहोत, विशेषतः ग्रामीण व कमी सुविधा असलेल्या भागांत. याशिवाय, भारतीय उत्पादक देशाच्या डिजिटल परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग बनतील, यासाठीदेखील आम्ही प्रयत्न करत आहोत.''

## पुनमचंद्र भीमराव भोसले यांना पीएच. डी. प्रदान



छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी ''विलियम वर्डस्वर्थच्या निवडक कवितांचे कार्यात्मक शैलीत्मक विश्लेषण'' यां विषयावर संशोधन केले. पुनमचंद्र भीमराव भोसले यांनी, डॉ. विवेक मिरगणे, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, बीड, जिल्हा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रबंध सादर केला आहे. त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# स्मशानभूमीत लाईट बंद अंधारात दिला अग्निडाग !, नगरपालिका प्रशासनाचा ढिसाळ कारभार !

कन्नड दि.५ (प्रतिनिधी)- शहरातील माळीवाडा परिसरातील स्मशानभूमीत सोयी सुविधांचा अभाव दिसत आहे एकीकडे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील स्मशानभूमीच्या सोयी सुविधा बाबत गांभीर्याने लक्ष दिले असून मात्र कन्नड शहरातील नगरपालिकेला याचा विसर पडलेला दिसत आहे

दि.०४ रोजी माळीवाडा येथील कृष्णा बारकू बल्हाळ यांचे दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी रात्री आठ वाजता माळीवाडा स्मशानभूमी येथे झाला यावेळी स्मशानभूमीत विद्युत पुरवठा नसल्याने रात्रीच्या अंधारात मोबाईलच्या उजेडात नातेवाईकांना अंत्यसंस्कार करावा लागला,कन्नड नगरपालिका सध्या रामभरोसे असून नवनियुक्त मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव यांच्या कडे नगरपालिकेचा कारभार येताच नगरपालिका सुरळीत होईल अशी अपेक्षा नागरिकांना लागली होती पण तसे काही चित्र दिसून येत नाही, अंधारात अंत्यसंस्कार करावे लागल्याने नागरिकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे




आम्ही वारंवार नगरपालिका प्रशासनाला कळवून सुध्दा याकडे गांभीर्याने प्रशासन लक्ष देत नाहीये त्यामुळे समस्त माळीवाडा वासीयांना नगरपालिकेसमोर आंदोलन करावे लागणार आहे

**- सोमेश्वर राऊत** (नागरिक)

रात्रीच्या अंधारात अंत्यसंस्कार करण्याची वेळ आमच्यावर नगरपालिका प्रशासनाने आणली आहे,एकीकडे सुख सुविधांचा गाजावाजा कागदावर करायचं आणि मुळात सुविधांचा अभाव

**- नंदू शिरसे** (नागरिक)

मुळात प्रशासनावर लोकप्रतिनिधीचे वचक नसल्याने प्रशासन मजेत आहे,कन्नड नगरपालिकेचा एवढा भोंगळ कारभार असून सुद्धा प्रतिनिधी शांत कसे

**अजय पातळे**

(नागरिक)

स्मशानभूमीत कोणत्याच सुविधा नाही,ना तिथे पाण्याची व्यवस्था आहे नाही लाईटची व्यवस्था आहे,तरी सुद्धा प्रशासनाला याचे गांभीर्य नाही

**- किशोर डोळस**

(नागरिक)

## सावधान शहरात अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्या विरोधात होणार फौजदारी गुन्हा दाखल

### नगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर !

कन्नड दि.५ (प्रतिनिधी)- शहरात अनधिकृत फ्लेक्स बॅनर लावणाऱ्या विरोधात नगरपालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारत फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे नगरपालिका प्रशासनाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकाद्वारे आव्हान केले आहे की शहरातील कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी बॅनर, होर्डिंग, फ्लेक्स,पोस्टर्स,लावण्यात येऊ नये शहरात कुठेही विनापरवानगी बॅनर, होर्डिंग, फ्लेक्स,पोस्टर्स, लावल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे आव्हान करण्यात आलेला आहे

शहरात विविध ठिकाणी बॅनर, होर्डिंग्स फ्लेक्स लावण्याची जणू काही स्पर्धाच लागली आहे यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे, शहरातून जाणाऱ्या जुन्या राष्ट्रीय महामार्गावर या अनधिकृत बॅनर होर्डिंग्सने अतिक्रमण केले आहे शहरातील पिशोर नाका परिसरात तर चहू बाजूने बॅनरने वेढलले आहे, नगरपालिका प्रशासनाच्या या निर्णयामुळे शहरातील अनधिकृत बॅनर्स होर्डिंग्स वर नियंत्रण मिळेल यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे

शहरात मुख्य ठिकाणी बॅनर्स लावण्यावरून राजकीय मंडळींमध्ये चढाओढ पाहायला मिळते पण नगरपालिकाने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकाचा काही फरक पडतो का? की राजकीय नेत्याच्या दबावाला नगरपालिका प्रशासन बळी पडते का ?

नगरपालिकाने ठरवून दिलेल्या ठिकाणावरच बॅनर्स होर्डिंग लावण्यात यायला पाहिजे पण तसे न होता शहरात वाटेल तिथे हे होर्डिंग्स लावण्यात येतात त्यांच्यावर कारवाई होणे अत्यंत गरजेचे होते

**- दिपक शिरसाठ**

सामाजिक कार्यकर्ते

ज्या ठिकाणी वाहनांना वळण घ्यावे लागते त्याचौकांमध्ये परवानगी देऊच नये कारण समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे अशा ठिकाणी परवानगी देऊ नये

**- शेखर मांडे**

मुख्यध्यापक

शहरात अनधिकृतपणे होर्डिंग्स लावण्यात येत असल्याने प्रशासनाच्या कुठल्याही धाक नसल्याकारणाने हवे त्या मापात हवे त्या ठिकाणी होर्डिंग बॅनर लावण्यात येत होते त्यामुळे कन्नड शहराचे विद्रुपीकरण होत होते

**- नितीन राठोड**


स्वराज्य रक्षक संघ प्रमुख कन्नड

पिशोर नाक्यावर तर चक्क पोलीस चौकी समोर मोठ मोठाले होर्डिंग लावण्यात येत आहे त्याच ठिकाणी नगरपालिका प्रशासनाच्या स्वच्छता निरीक्षका चे कार्यालय आहे या मोठमोठ्या होर्डिंग बॅनर हे कार्यालय झाकून जात होते

**- संतोष नीळ**

नागरिक

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०८) साध्यं-सिद्ध- सिद्धता

विजयाशमीच्या सुमुहुर्तावरसंघ स्थापन झाला तेव्हापासून आजतागायत संघाचे अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक - नैतिक धार्मिक सामाजिक- शारीरिक- राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झालेआहे. उदाः- व्यक्तिगत जीवनातून- समष्टी जीवनाकडे; दास्याकडून- स्वातंत्र्याकडे; निद्रेतून जागृती कडे; दैन्यातून- समृद्धीकडे ; दौर्बल्ल्यातून - सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्यं- सिद्धं- सिद्धता झाली आहे.

आजसुद्धा प्रतिवर्षी विजयादशमीला

ठेवुनी चेहरा हसरा। दुःख सगळे विसरु या. ।या सोनियाचा दिनी ही शपथ घेऊ या।

विः - विजय मिळवूनी षड्रिपूंवरी।

जः- जय मिळवू या मनावरी ।।

याः- यातना कितीही झाल्या तरी।

दः- दररोज एक नियम पाळू या।

शः- शरणागत होऊ श्रीरामचरणी।

मीः- मी पणा दूर सारू या।।

श्रीराम जय राम जयजयराम ।। भारत माता की जय ।।

।। वंदे मातरम् ।। क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**

छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,

माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## संगमनेर व राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना पुरेशा पाण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन

### संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी उजव्या कालव्यातून अनधिकृत उपसा न करण्याचे आवाहन

शिर्डी दि.४ (प्रतिनिधी)- ऊर्ध्व प्रवरा (निळवंडे २) प्रकल्पाच्या उजव्या कालव्यामधून पाणी टप्प्याटप्प्याने सोडण्यात येत असून, संगमनेर व राहूरी तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांना पिण्यासाठी व शेतीकरिता पुरेसे पाणी मिळेल याचे नियोजन जलसंपदा विभागाने केले आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी कालव्यात अनधिकृतपणे पाइप टाकून पाण्याचा उपसा करू नये, असे आवाहन उर्ध्व प्रवरा धरण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे यांनी केले आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार, निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यातून २० एप्रिलपासून लाभक्षेत्रात पाणी सोडण्यात आले आहे. पाण्याचे नियोजन करताना बंधारे, के.टी. विअर व पाझर तलाव भरून प्रत्येक शेतकऱ्याला समान पाणी मिळावे, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

प्रथम टप्प्यात राहूरी तालुक्यातील गावांना १७ मे २०२५ पर्यंत आवर्तन देण्यात येणार असून, त्यानंतर १८ मे पासून संगमनेर तालुक्यातील गावांना पाणी देण्यात येणार आहे ; मात्र १ मे रोजी संगमनेर तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी उजव्या कालव्यात नियोजनाविना पाइप टाकल्याने राहुरी तालुक्यात जाणारे पाणी अडथळले गेले. त्यामुळे प्रशासनास पोलिसांची मदत घ्यावी लागली आहे.

संगमनेर व राहुरी तालुक्यांतील शेतकऱ्यांना शेती आणि पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळेल. त्यामुळे सर्वांनी सहकार्य करावे आणि विभागाच्या नियोजनात अडथळा आणू नये, असे आवाहनही श्री.हापसे यांनी केले आहे.

## शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती व नवोपक्रम स्पर्धेत मोइनुल उलूम हायस्कूल येथील सय्यद अजमत इलियास प्रथम

गंगापूर दि.५ (प्रतिनिधी)- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे मार्फत शिक्षकांसाठी तालुका व जिल्हास्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये घेण्यात आली होती. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर यांनी या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे आयोजित केला होता .या स्पर्धेत मोइनुल उलूम हायस्कूल येथील सहशिक्षक सय्यद अजमत इलियास यांना तालुका व जिल्हा स्तरावर प्रथम पारितोषिक मिळालेले आहे. त्यांचा माननीय जिल्हा अधिकारी श्री दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व रोख बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांनी नवोपक्रम मध्ये सुद्धा जिल्ह्यात बक्षीस मिळवलेले आहे त्या प्रित्यर्थ प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माननीय प्राचार्य श्रीमती सानवी देशमुख, माननीय श्रीमती अश्विनी लाटकर शिक्षणाधिकारी माननीय श्री प्रकाश माटे प्रकल्प प्रमुख, माननीय वैशाली जागीरदार अधिव्याख्याता, माननीय श्रीमती भालेराव अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर येथील सर्व मान्यवर, जिल्ह्यातून आलेले पुरस्कार प्राप्त शिक्षक त्यांचे स्नेही व नातेवाईक समाजातील शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सदर बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. या यशाबद्दल सिल्क मिल्स औरंगाबाद एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष माननीय मुजतबा महमूद खान, उपाध्यक्ष आरिफ खान,सचिव जिया अहमद खान, उपसचिव मुबीन मोमीन, नजम खान, सदस्य राशीद अली खान शाळेचे प्राचार्य शहजाद खान, उपमुख्याध्यापक संतोष चिंतामणी, पर्यवेक्षिका कौसर फातेमा, सर्व शिक्षक वृंद यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



# सोयगाव; गावातल्या समस्येचं उत्तर गावात शोधा म्हणजे गाव समृद्ध होईल - विलासअण्णा दहीभाते

### सोयगाव येथे समर्पण फाऊंडेशन व करिअर मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन

सोयगाव दि.५ (प्रतिनिधी)- पूर्वी आपली गावे समृद्ध होती.कारण गावात परस्परावलंबित्व होते आणि त्यामुळे गाव स्वावलंबी होते. आज परस्परावलंबित्व कमी होत असल्यामुळे गाव स्वावलंबी व आत्मनिर्भर होत नाहीये.त्यासाठी आपल्याला गावातील समस्याचे उत्तर गावातच शोधावे लागेल असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत ग्रामसेवक गतिविधि संयोजक विलासअण्णा दहीभाते यांनी केले,ते समर्पण फाउंडेशन व मोफत करिअर मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमास मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक व रा.स्व.संघाचे प्रांत ग्रामविकास संयोजक विलास दहीभाते यांची प्रमुख उपस्थित होती.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते गुलाबी फित कापून उद्घाटन करण्यात आले.यावेळी जिवन राजपूत व अनंत जगताप यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्षल फुसे,सूत्र संचालन ॲड स्वप्नील सुरळकर व आभार प्रदर्शन कल्पेश जोशी यांनी केले.समर्पण फाऊंडेशनचे प्रमुख हर्षल फुसे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले,की सोयगाव तालुक्यातील काही स्वयंस्फूर्त तरुणांनी मिळून समाजाभिमुख काम करण्यासाठी ग्राम विकास,पर्यावरण संवर्धन,आरोग्यसेवा, कृषी अशा विविध क्षेत्रात सेवाकार्य करण्यासाठी संकल्प केला.त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत करिअर मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.या माध्यमातून आम्ही गाव स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करत आहोत असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक विलासअण्णा दहीभाते म्हणाले,गावातल्या समस्या गावात शोधून त्याचे उत्तर गावातच शोधले पाहिजे.गावातील लोकांनी त्यावर एकत्रितपणे काम केले पाहिजे.गावातल्या उत्पादित होणाऱ्या वस्तू पदार्थांना गावातच मार्केट उपलब्ध करून दिले पाहिजे.आपण प्रथम त्या वस्तुंचा प्राधान्य देऊन खरेदी केले पाहिजे.विदेशी,ब्रँडेड वस्तूचा आग्रह सोडला पाहिजे. असे केल्यास आपले गाव आणि आपली माणसं आत्मनिर्भर होईल.समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून सोयगाव,आमखेडा याठिकाणी हे होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी समर्पण फाऊंडेशनचे प्रमुख हर्षल फुसे,हेमंत नागापुरे,राजू फुसे,रवी गिरी,राहुल फुसे, अनिल फुसे,संकेत बैरागी,आकाश गव्हाड,सागर कोथलकर, सुरेश ढगे,मनोहर आगे,शंकर मिसाळ,सुदर्शन बारी,शुभम बोडखे,यश वामने,अनिल मोरे,सागर इंगळे,मंगेश ताडे, शिवा आगे,ओम रोकडे, विशाल परदेशी,मयुर राजपूत इ. कार्यकर्त्यांनी कार्यक्रम व्यवस्थेसाठी मेहनत घेतली.




समर्पण फाउंडेशन तरुणांनी सुरू केलेली संस्था पाहून खूप आनंद झाला.ग्रामीण भागातील तरुण जर एवढे उच्च ध्येय आणि समाजहिताचा विचार करून असे कार्य सुरू करत असेल तर ही अभिमानाची गोष्ट आहे.मी सुद्धा याच भागातील एक सामान्य कार्यकर्ता असून गावातील समस्या मी पण पाहिल्या आहेत. आज मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाची जबाबदारी माझ्याकडे असल्यामुळे मी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी काम करतो.समर्पण फाउंडेशनच्या आम्ही सोबत आहोत आणि सर्वतोपरी मदत करू असे प्रतिपादन त्यांनी केले.

**- रामेश्वर नाईक,**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी प्रमुख,

महाराष्ट्र राज्य

## सोयगाव तालुक्यातील नांदगाव तलावात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

सोयगाव दि.४ (प्रतिनिधी)- तीन्ही नातेवाईक बैलांना पाणी पाजण्यासाठी तलावावर गेले असता तेथे बैलाना पाण्याने धुऊन काढीत असतांना तिघांचा खोल पाण्यात पाय गेला यामध्ये (अकील शकील पठाण वय.१८ रा.नादंगाव तांडा ता.सोयगाव) तर (रेहान भिकन शेख वय १५ रा.सातगाव डोगंरी ता.पाचोरा)या दोन तरुणांचा दुदैवी मृत्यू झाला तर (साकीब कलंदर पठाण वय.१३ रा घाटनांद्रा) ता सिल्लोड याला ग्रामस्थांनी वाचविले असुन सद्या साकीब पठाण यास उपचारासाठी पाचोरा येथील खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे ही घटना सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथील तलावावर दुपारी बारा वाजेच्या सुमारास घडली.

नांदगाव तांडा येथे गावालगत मोठा तलाव असुन सद्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने सर्वकडे पाणीची टंचाई भासत असते त्यामुळे गावाजवळच तलाव असल्याने गावातील प्रत्येक जन आपली जनावरे पाणी पाजण्यासाठी तलावावर घेऊन जातात भर दुपारी अकील पठाण,रेहान शेख,व साकीब पठाण हे तिघे नातेवाईक बैलांना पाणी पाजण्यासाठी तलावावर घेऊन गेले पाणी पाजल्यानतंर आपण बैलाना धुवुन काढीत असतांना अचानक त्यांचा तोल खोल पाण्यात गेला खोल पाण्यात गटांगळ्या खात असताना तेथे असलेली काही नागरिकांनी आरडा ओरडा केल्याने अवघ्या काही क्षणातच आख्खे गाव तलावावर जमा झाले यावेळी काहींनी तलावात उड्या मारुन तिघांना बाहेर काढुन पाचोरा येथील दवाखान्यात घेऊन गेले असता अकील पठाण व रेहान शेख यांना तपासुन मृत घोषित केले तर साकीब पठाण वर यास उपचार चालु आहे मयत दोघांची उत्तरीय तपासणी पाचोरा येथे करण्यात आली आहे अकील च्या पश्चात आई,वडील,एक भाऊ तर रीहान च्या पश्चात आई,एक भाऊ असे परिवार आहेत.

## अग्रलेख...

# आता सुरू झालाय खरा खेळ...

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथील बैसरण घाटीत पाकिस्तान पुरस्कृत 'द रजिस्टन्स फ्रन्ट' (टीआरएफ) या दहशतवादी संघटनेने पर्यटकांवर अमानवीय हल्ला करून २६ जणांना ठार केले. केंद्रातील भाजपा नेतृत्वाखालील सरकार पाहता या घटनेचे दूरगामी परिणाम होणार याची जाणीव असतानाही एवढे मोठे हत्याकांड घडविण्याची जोखीम टीआरएफने पत्करली. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने बालाकोट येथे हल्ला करून, आम्ही प्रसंगी नियंत्रण रेषा ओलांडून धडा शिकवू शकतो, हे दाखवून दिले. या घटनेला आज पाच वर्षे उलटली. या काळात काश्मिरातील परिस्थितीत बराच बदल झाला. पैसे घेऊन सुरक्षा दलांवर दगडफेड करण्याचे कंत्राट घेणारे आज एक तर तुरुंगात आहेत किंवा चकमकीत ठार झाले. दर शुक्रवारी नमाजानंतर रस्त्यावर उतरून भारतविरोधी नारेबाजी करणे बंद झाले. एकीकडे दहशतवादी संघटना आणि हुरियतसारख्या बंडखोर संघटनांच्या आर्थिक नाड्या आवळून केंद्र सरकारने त्यांना पुरते नेस्तनाबूत केले. लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दिन, अल-बद्र सारख्या संघटनांचे शेकडो दहशतवादी २०१६ नंतरच्या चकमकींमध्ये ठार झाले. काश्मिरी आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांनी विणलेले जाळे खिळखिळे झाल्यानंतर २०१९ मध्ये 'द रजिस्टन्स फ्रन्ट' ही नव्याने डोकेदुखी निर्माण झाली. या संघटनेने केवळ सुरक्षा दलांना नव्हे तर गैर काश्मिरींना ठार मारण्याचे लक्ष्य ठेवले. त्यामुळे सुरक्षा दल आणि प्रशासनासमोरील संकट अधिक गडद झाले. जंगलात लपलेल्या अथवा समोरून हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांशी लढा देणे एकवेळ सोपे, पण नागरिकांमध्ये राहून टार्गेट किलिंग करणाऱ्या धर्मवेड्यांचा सामना करणे कठीण. आज टीआरएफ जे काही करीत आहे ते याच श्रेणीतील आहे.

उरी, पुलवामा आणि आता पहलगाम या तीन दहशतवादी घटना भारतीय सुरक्षा दले आणि गुप्तचर संघटनांची काही प्रमाणात पोलखोल करणाऱ्या आहेत. २०१६ मधील उरी आणि २०१९ मधील पुलवामा या दोन्ही घटनांमध्ये दहशतवाद्यांनी लष्कराला टार्गेट केले होते. त्याचा बदलाही भारताने लष्करी कारवाया करून घेतला होता. पण पहलगाम हल्ल्यात नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. या घटनेची मुळे खोलवर रुजलेली आहेत. एनआयचा तपास जसाजसा पुढे जातो आहे तसा स्थानिकांचा सहभाग पुढे येतो आहे. काश्मिरात वरवर दिसणाऱ्या शांततेच्या आवरणाच्या आत देशद्रोही आणि अस्तनीतील साप वळवळ करीत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे सध्यातरी काश्मिरात कितीही विकास केला, आर्थिक सुबत्ता आली तरी संकट मात्र कायम राहणार असल्याचे दिसते.

पहलगामनंतर भारत आता पुन्हा एकदा उरी अथवा बालाकोटसारख्या लष्करी कारवाया करेल, असे नागरिकांना वाटण्यात काही गैर नाही. कारण, सरकार आणि सत्ताधारी पक्ष या घटनांची सातत्याने उजळणी करीत असतात. त्यामुळे दररोज रात्री झोपताना उद्या सकाळी काहीतरी घडलेले असेल, अशी भावना नागरिकांमध्ये प्रबळ झाली आहे. विरोधी पक्षांनाही असेच वाटत आहे. अर्थात विरोधकांचा हा प्रकार डिवचण्याचा आहे. पण, पहलमाग हल्ल्यानंतर भारत जी पावले उचलत आहे ते पाहून केवळ लष्करी कारवाई करून वरवरची मलमपट्टी आणि काही उथळ प्रवृत्तीच्या देशभक्तांमध्ये क्षणिक वीरश्री संचारण्यासारखी कृती न करता पाकिस्तानला कायमस्वरूपी धडा शिकविण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. सध्याच्या अद्ययावत सामरिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्यक्ष रणांगणावरील युद्ध हा अंतिम पर्याय असावा. कारण शत्रूची क्षमता ही आता संख्येवर नव्हे तर तो किती परिणामकारक आहे, यावर ठरते. तसेही पाकिस्तानला गमावण्यासारखे काहीच नाही. तेथून जो काही विरोध होईल तो लष्करी पातळीवरूनच. आर्थिक पातळीवर पाकिस्तान पुरता संकटात सापडलेला आहे. भारताने एकवेळ तात्पुरती लष्करी कारवाई करून वेळ मारून नेणे पाकिस्तानला परवडेल, अशी तेथील राजकारण्यांची भावना आहे पण पहलगामनंतर भारत एकामागून एक जी पावले उचलत आहे ती पाकिस्तानच्या विनाशास कारणीभूत ठरणारी आहेत. सिंधू पाणी वाटप करार स्थगित करणे हा पाकिस्तानच्या वर्मावर घातलेला घाव आहे. कारण याचे दूरगामी परिणाम स्वातपासून तर सिंधपर्यंत दिसणार आहेत. तसाही पाकिस्तानचा सिंध प्रांत आतून खदखदतो आहे. पाकिस्तानी लष्कर आणि राजकारणात पंजाब्यांचे वर्चस्व आहे. पंजाब आमच्या वाट्याचे पाणी पळवीत असल्याचा आरोप सिंधचा आहे. पंजाबमधील ८० टक्के शेती ही पश्चिमीवाहिनी नद्यांवर अवलंबून आहे. भारताने जर सिंधू नदीचे पाणी अडविले तर पाकिस्तानचा सिंध प्रांत पाण्यावाचून तडफडणार आहे. मग, येथे खरा संघर्ष सुरू होईल तो जनता आणि सरकार यांच्यात. कारण युद्धाची खुमारी फार काळ टिकत नाही. पण, पोटात अन्नच नसेल तर जनता कुठल्याही थराला जाऊ शकते. अर्थात पाण्यासाठी पाकिस्तानात गृहयुद्ध भडकण्याची शक्यता आहे. अर्थात लगेचच पाणी अडविले जाणार असेही नाही. २०१६ मध्ये जेव्हा उरी येथे दहशतवादी हल्ला झाला होता तेव्हाच पाणी आणि रक्त एकत्रपणे वाहू शकत नाही, असा इशारा भारताने दिला होता. दोन्ही देशांमध्ये अटारी-वाघा सीमेवरून जो काही थोडाफार व्यापार होत होता तोही आता बंद झाला. सीमेचे दरवाजे बंद केल्यानंतर आता पाकिस्तानवर व्यापारबंदी घातली. याचा परिणाम सीमेपलीकडील अर्थव्यवस्थेवर होणार आहे. भारत मोठ्या प्रमाणात सुकामेवा आणि साखर, कापूस, फळे, मीठ, रत्न-खडे आदी साहित्य प्रत्यक्ष अथवा तिसऱ्या देशाच्या माध्यमातून आयात करीत असे. भारतातील बाजारपेठ पाहता पाकिस्तानला व्यापारात फायदा होत असे. पण व्यापारबंदीने पाकिस्तानला मोठा फटका बसणार आहे. आता दोन्ही देशांतील व्यापार शून्य होणार आहे. औषधे निर्मिती आणि उत्पादन क्षेत्रात आज भारताचा दबदबा आहे. कोविडच्या काळात साऱ्या जगाला याची प्रचीती आली. गरीब देशांना मोफत लसही भारताने पुरविली होती. अमेरिकेच्या ४० टक्के जेनरिक औषधांची गरज भारत पूर्ण करतो. वाघा-अटारी सीमेवरून आणि खाडी देशांच्या माध्यमातून पाकिस्तान भारतातून अगदी पॅरासिटेमॉल गोळीपासून तर जीवनरक्षक औषधांची आयात करतो. अनेकवेळा दहशतवादी हल्ले होऊनही दिल्लीने मानवीय आधारावर औषधांची निर्यात थांबविली नव्हती. कोविड काळातही युनोच्या माध्यमातून कोविड लसींचा पुरवठा पाकिस्तानला केला होता. पण, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाम हल्ला घडवून आणल्यानंतर भारताच्या संयमाचा अंत झाला आणि पाकिस्तानसोबत सर्वच प्रकारचे व्यापारी संबंध संपुष्टात आणले. परिणामी इस्लामाबादला आता स्वस्त आणि परवडणारी भारतीय औषधे मिळणार नाहीत. आधीच आर्थिक तंगीने त्रस्त असलेल्या जनतेला महागडी औषधे खरेदी करावी लागणार आहेत. भारत वेगाने मेडिकल हब म्हणून उदयास येत असल्याने येथील स्वस्त उपचाराचा फायदा पाकिस्तानी नागरिकांना होत असे. वैद्यकीय व्हिसा घेऊन दरवर्षी असंख्य पाकिस्तानी नागरिक भारतात उपचार करण्यासाठी येत असत. काहीवेळा गरीब नागरिकांवर मोफत शस्त्रक्रिया केल्याची उदाहरणेही आहेत. पण, व्हिसा बंद केल्याने पाकिस्तानी नागरिकांना स्वस्त वैद्यकीय उपचारांचा लाभ घेता येणार नाही. त्यामुळे शस्त्रांचा वापर करून नव्हे तर शत्रूला त्याच्याच भूमीवर नामोहरम करणे म्हणजे खरा विजय होय. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धापेक्षा पाणीबंदी, व्यापारबंदी, सीमाबंदी, टपालबंदी, व्हिसाबंदीमुळे पाकिस्तानचे प्रचंड आणि अगणित नुकसान होणार आहे. परिणामी पाकिस्तानला ताळ्यावर आणण्यासाठी युद्धाचा लगेच अवलंब न करता मोदी सरकारने एकाचवेळी विविध आयुधांचा वापर करीत पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी केली आहे. एवढेच नव्हे, तर बागलीहार धरणाचे दरवाजे बंद करीत चिनाब नदीचे पाकिस्तानला जाणारे पाणीही रोखले आहे. भारताच्या या कृतीने पाकिस्तानला दिवसा तारे दिसू लागतील. भारताने पाणी अडविल्यास क्षेपणास्त्रांचा मारा करू, आमच्याकडे असलेले १७० अणुबॉम्ब भारतासाठीच राखून ठेवले आहेत, पाकिस्तानकडे गमावण्यासारखे काहीच नाही, सिंधू नदीतून एकतर पाणी वाहील किंवा भारतीयांचे रक्त, अशी पाकिस्तानकडून केली जाणारी वक्तव्ये म्हणजे त्यांनी घेतलेली धास्ती आणि होणारी तडफड दिसून येते. आता तर खरा खेळ सुरू झाला आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**


# एका राष्ट्रपतींची वैद्यकीय तपासणी!

'द डेंजरस केस ऑफ डोनाल्ड ट्रम्प!' २०१७ साली प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाची जोरदार विक्री सध्या अमेरिकेत सुरू आहे. २७ मानसोपचार तज्ज्ञांचा अभिप्राय असलेले हे पुस्तक बॅण्डी ली यांनी लिहिले आहे. एक राष्ट्रपती म्हणून ट्रम्प किती घातक ठरतील याचे विवेचन या पुस्तकात करण्यात आले होते. ट्रम्प यांच्या राष्ट्रपतिपदाच्या पहिल्या कार्यकाळात ते प्रसिद्ध झाले होते. विशेष म्हणजे पुस्तक लिहिले जात असताना ट्रम्प हे राष्ट्रपती होते आणि आज त्या पुस्तकाचा प्रत्यय साऱ्या जगाला येत आहे. मात्र या पुस्तकात एक त्रुटी असल्याचे काहींना वाटते.

**'गोल्डन फिश रुल'** : 'गोल्डन फिश रुल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका नियमाचे यात पालन करण्यात आलेले नाही असे या मंडळींना वाटते. रुग्णाची प्रत्यक्ष तपासणी करूनच कोणताही निष्कर्ष काढण्यात यावा याला 'गोल्डन फिश रुल' म्हटले जाते. या मानसोपचार तज्ज्ञांनी ट्रम्प यांची प्रत्यक्ष तपासणी न करता आपले निष्कर्ष काढले असल्याने त्यांनी या नियमाचे पालन केलेले नाही व म्हणून त्यांच्या निष्कर्षांवर विश्वास ठेवता येणार नाही असे या पुस्तकाला विरोध करणाऱ्यांचे प्रतिपादन आहे.

**वैद्यकीय तपासणी** : मेरिलॅण्डमधील वॉल्टर रिड नॅशनल मिलिटरी मेडिकल सेंटर या रुग्णालयात राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांची सखोल वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि या तपासणीचे निष्कर्ष व्हाईट हाऊसने जारी केले. अमेरिकेत ही एक परंपरा आहे. चांगली परंपरा आहे. राष्ट्रपती ट्रम्प एकदम तंदुरुस्त असल्याचा निष्कर्ष या वैद्यकीय चाचणीवरून काढण्यात येत आहे. ट्रम्प यांनी आपल्या आयुष्यात कधीही सिगारेट वा दारू यांचे सेवन केले नसल्याचेही या अधिकृत वैद्यकीय अहवालात सांगण्यात आले आहे. ट्रम्प यांची शारीरीक स्थिती ठीक असल्यानेच ते गोल्फ या खेळाच्या अनेक स्पर्धा आजही जिंकत असल्याचे व्हाईट हाऊसने म्हटले आहे.

**प्रश्न मानसिक स्थितीचा** : राष्ट्रपती ट्रम्प यांची शारीरिक स्थिती एकदम ठीक असली तरी त्यांची मानसिक अवस्था ठीक नसावी असे अनेकांना वाटत आहे. व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात ते ज्या पद्धतीने बोलतात, वागतात त्यावरून हा निष्कर्ष काढला जात आहे. जगातील वेगवेगळ्या देशांचे राष्ट्रपती, प्रमुख व्हाईट हाऊसच्या ओव्हल कार्यालयात गेले असताना, ट्रम्प त्यांना ज्या पद्धतीने अपमानित करतात, वेगवेगळ्या वाहिन्यांच्या पत्रकारांना अपमानित करतात ते सर्वांना दिसत आहे. हे आजवर कधी घडले नव्हते. ट्रम्प यांचे हे वर्तन पाहिल्यानंतर ते राष्ट्रपतिपदासाठी खरोखरीच पात्र आहेत काय, असा प्रश्न अमेरिकेत विचारला जाऊ लागला आहे.



**पराभवाचे कारण** : २०२४ च्या नोव्हेंबर महिन्यात झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत ट्रम्प विजयी झाले असे म्हणण्यापेक्षा पदासीन राष्ट्रपती जो बायडेन पराभूत झाले. बायडेन यांच्या पराभवाचे मुख्य कारण होते त्यांची शारीरीक व मानसिक अवस्था. बायडेन यांना अनेक बाबी स्मरणात राहात नव्हत्या. चालताना ते अडखळत होते. या साऱ्याचा फटका डेमोक्रॅट उमेदवार कमला हॅरिस यांना बसला. वास्तविक बायडेन यांची धोरणे अमेरिकेसाठी चांगली होती. त्यांनी नाटोला मजबूत केले. युद्धजन्य युक्रेनला भेट दिली. अमेरिकेच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा केली. बेरोजगारीचा दर कमी केला. औद्योगिक उत्पादन वाढले. प्रकृतीने साथ दिली असती तर बायडेन पुन्हा निवडून आले असते. पण, ढासळत्या शारीरीक व मानसिक स्थितीने ते पराभूत झाले असे मानले गेले.

**नवा अवतार** : राष्ट्रपतिपदावर विराजमान झाल्यापासून ट्रम्प, त्यांचे उपराष्ट्रपती वान्स जसे वागत आहेत तसे वर्तन आजवर कोणत्याही राष्ट्रपतीने केलेले नाही. शालीनता व मुत्सद्देगिरीचे सारे नियम धाब्यावर बसवून दोघेही सरकार चालवीत आहेत.

**हार्वर्ड - एक विनोद** : हार्वर्ड हे एक जागतिक दर्जाचे विद्यापीठ मानले जाते. ट्रम्प यांनी या विद्यापीठाला जणू लक्ष्य केल्यासारखे दिसत आहे. या विद्यापीठाला अमेरिकेच्या केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान बंद करण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. ''हार्वर्ड विद्यापीठ तसाही एक मोठा विनोद आहे. ते बंद पडल्याने काहीही बिघडणार नाही. त्यांना संघीय सरकारकडून अनुदान हवे असेल तर काही अटींची पूर्तता करावी लागेल. आपल्या कामात पारदर्शिता आणावी लागेल. तरच त्यांना हे अनुदान मिळू शकेल'', असे ट्रम्प यांनी म्हटल्यानंतर या विद्यापीठाने ट्रम्प प्रशासनाच्या अटी स्वीकारण्यास नकार दिला. अर्थात हे त्यांचे ताजे विधान आहे. कॅनडासारख्या मित्र देशाचा उल्लेख ते अमेरिकेचे ५१ वे राज्य असा करतात तेव्हा ट्रम्प यांचे मानसिक संतुलन किती ढळले असावे याची कल्पना करता येईल.

**केवळ शब्दांचा खेळ** : राष्ट्रपती ट्रम्प सत्तेवर आल्यापासून त्यांनी केवळ शब्दांचा खेळ चालविला असल्याचे आता मानले जात आहे. टेरिफ म्हणजे आयात शुल्क प्रकरण त्यांनी ज्याप्रकारे हाताळले त्याने साऱ्या जगाला मंदीच्या सावटाखाली आणले आहे. जागतिक व्यापार संघटनेने याबाबत नवे आकडे जारी केले असून, जगाची अर्थव्यवस्था निश्चितच मंदावणार असल्याचे म्हटले आहे.

**असभ्य भाषा** : जगातील अन्य देशांच्या प्रमुखांसाठी ट्रम्प उच्चारीत असलेली भाषा केवळ अहंकाराची नाही तर असभ्य ठरावी अशी आहे. ट्रम्प यांच्या काही शब्दांचा उल्लेख या स्तंभातही करू नये एवढा असभ्य आहे. अमेरिकेतच काय, कोणत्याही देशाचे प्रमुख दुसऱ्या देशांच्या प्रमुखासाठी अशा शब्दांचा वापर करीत नसतात. आंतरराष्ट्रीय संबंधात तर भाषा सर्वांत महत्त्वाची मानली जाते. पण, ट्रम्प साऱ्या मर्यादा वाऱ्यावर सोडून वागत आहेत.

**पत्रकारांचा अपमान** : व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या नियमित पत्रपरिषदांमध्ये अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना अपमानित करणे हा तर ट्रम्प यांचा जणू खेळ झाला आहे. सीएनएनसारख्या वाहिनीबाबत ते त्या वाहिनीच्या वार्ताहरास म्हणाले, ''सीएनएन चॅनेल आता कुणीही पाहात नाही. त्यामुळे तुमच्या प्रश्नाला काहीही अर्थ राहिलेला नाही. '' फॉक्स नावाचे एकमेव चॅनेल ट्रम्प यांच्या बाजूने बोलत असते. हे चॅनेल वगळता अन्य सर्व चॅनेलवर त्यांनी जणू बहिष्कार घातला आहे.

**आसन व्यवस्था** : व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या पत्रपरिषदांमध्ये पत्रकारांची आसन व्यवस्था तेथील पत्रकार संघटना ठरवीत आली आहे. ट्रम्प प्रशासनाने ही व्यवस्था बदलण्याचा निर्णय घेतला असून, सरकारी अधिकारी ती ठरविणार आहेत. अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना मागील रांगेत तर सोयीचे सोपे प्रश्न विचारणारे पत्रकार समोरच्या रांगेत बसणार अशी नवी व्यवस्था व्हाईट हाऊस करणार आहे.

**मानसिक तपासणी** : बहुतेक देशाच्या राज्यघटनेत राष्ट्रपती वा पंतप्रधान यांच्या पात्रतेबाबत जे काही नमूद करण्यात आले आहे, त्यात त्याचे मानसिक संतुलन ही महत्त्वाची अट घालण्यात आली आहे. राष्ट्रपती ट्रम्प आपल्या कारकीर्दीचे १०० दिवस पूर्ण करीत असताना, त्यांच्या विधानांमुळे अमेरिकन जनमानस व जगातही त्यांच्या मानसिक संतुलनाबाबत प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत. राष्ट्रपती ट्रम्प यांची सध्याची वाटचाल अशीच चालू राहिल्यास येणाऱ्या काही काळात ट्रम्प यांच्या मानसिक संतुलनाची तपासणी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर झाल्यास आश्चर्य वाटू नये.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# ३६५ दिवसही हवी गतिमानता!

समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळावा, त्याची कामे तातडीने पूर्णत्वास जावी, प्रशासनात गतिमानता यावी म्हणून ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्रात याला उत्तम प्रतिसाद मिळाला. नागपूर ग्रामीण पोलिसांनी तर १०० पैकी ८० गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळवला. पालघरने पहिला क्रमांक पटकावला. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन.

पण प्रशासनात गतिमानता यावी म्हणून केवळ १०० दिवस कशाला, माझ्या मते ३६५ दिवस उपक्रम सुरू ठेवायला हवा. केवळ खानापूर्ती म्हणून नव्हे, तर हा उपक्रम मनापासून प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वीकारायला हवा. शासकीय विभागांचा विचार करता, पोलिस खाते २४ तास ३६५ दिवस सुरू राहते. विशेष म्हणजे पोलिस कर्मचारी सकाळी आणि सायंकाळी रोल कॉलच्या वेळी राष्ट्रगीत म्हणतात. याचा अर्थ ते दररोज १०४ सेकंद राष्ट्रगीताला देतात. राष्ट्रगीत म्हणण्यासाठी ५२ सेकंद लागतात. आता एका वर्षाचा विचार केला तर ३७९६० सेकंद पोलिस आपल्या आयुष्यातील राष्ट्राला समर्पित करतात. इतर विभागांतील कर्मचारी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि १ मे महाराष्ट्र दिनी म्हणजे केवळ तीन वेळा राष्ट्रगीत म्हणतात. समजा एखाद्याने वैद्यकीय रजा घेतली तर मग त्याची त्यातूनही सुटका होते. अशा प्रकारे वागणारे हे सरकारी विभागातील बाबूंची कार्यपद्धती बदलविण्याची वेळ आलेली आहे. पोलिस जर दररोज राष्ट्रगीताने कामकाज सुरू करतात तर मग इतर विभागातही तशीच पद्धत यायला नको का? तेही शासनाचे कर्मचारीच आहेत ना? अग्निशमन विभागही चोवीस तास कार्यरत राहतो. पण इतर विभागांचे काय? ते तर मस्तपैकी शनिवार, रविवार सुटी उपभोगतात. सुटी घेण्यास कुणाचीही हरकत नाही. मग सामान्य माणसांच्या कार्याचे काय? पोलिस विभाग जसा चोवीस तास कार्यप्रवण राहतो अगदी त्यानुसार इतरही खात्यांची रचना आता करण्याची वेळ आलेली आहे. पोलिसांकडे केव्हाही गेले तर त्यांच्याकडून पीडितांना मदत मिळते. त्यांना दिलासा मिळून ते सुखावतात, तरीही बदनामी केवळ आणि केवळ पोलिस खात्याचीच केली जाते. इतर विभागांतील मंडळी पोलिसांएवढाच किंबहुना त्यापेक्षा जास्त पगार घेतात. शनिवार, रविवार आणि इतरही सणांच्या सुट्या उपभोगतात. पण कामाची वेळ आली की, तोडपाणी केल्याशिवाय फाईल पुढे सरकवतच नाही. तरीही त्यांना जनता मानसन्मान देते. हा मानसन्मान पाहायचा असेल तर भूखंड, सदनिका, शेतीच्या संदर्भातील खरेदी-विक्रीपत्र तयार करणाऱ्या कार्यालयात जा. तिथे नियमापलीकडे अधिकचे पैसे देऊनही धन्यवाद म्हटले जाते. असा भेदभाव का, यावरही चिंतन करायची वेळ आलेली आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. ते शनिवार आणि रविवारला बंद असतात. मग दोन दिवस एखादी व्यक्ती आजारी पडली तर त्याने घरीच मरावे का? यावर उपाय म्हणजे प्रत्येकाची आठवडी सुटी वेगवेगळी ठेवावी. जेणेकरून कामावर कुठेही परिणाम होणार नाही अन् तो विभाग सातत्याने कार्यप्रवण राहील. पोलिस खात्यात प्रत्येकाच्या सुट्या वेगवेगळ्या असतात. तिथे कुठेही कामात खंड पडत नाही. मग असाच प्रघात आता इतरही शासकीय विभागांच्या संदर्भात सुरू व्हायला हवा. बँकांमध्येही ही सुविधा यायला हवी. आज शाळा, महाविद्यालये आणि बँकांच्या सुट्या पाहून हेवा वाटतो अन् यांना पगार नेमका कशाचा देतात असाच प्रश्न सामान्यांना पडतो. 'काम नाही पगार नाही' हे तत्त्व फक्त खाजगीत वापरतात. मग सरकारी खात्यात हा नियम लावायला कुणी मनाई केली आहे का? यावर कुणी चिंतनरूपी कृती करणार काय? शंभर दिवसांचा उपक्रम सुरू असताना केवळ पोलिस खाते सक्रिय होते. इतर विभागांनी केवळ खानापूर्ती केली याचीही नोंद मुख्यमंत्र्यांनी घ्यायला हवी. रामराज्य आणायचे असेल तर सामान्यातला सामान्य माणूस तहसील कार्यालयात जाताना आनंदित व्हावा. पटवाऱ्याकडे किंवा कृषी खात्याच्या कार्यालयात जाताना त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटायला हवे. पशुवैद्यकीय दवाखान्यात जाताना त्याच्यात उत्साह दिसायला हवा. प्राथमिक आरोग्य केंद्रात, ग्रामीण रुग्णालयात, बँकेत आणि विशेषतः प्रादेशिक परिवहन खात्याच्या कार्यालयात गेल्यावर तो सुखावला पाहिजे. प्रत्यक्षात तसे घडत नाही. येथेच रामराज्याची संकल्पना धुळीस मिळते. क्षुल्लक काम असले तरी सामान्यांना अधिकाधिक त्रास देण्याची क्रूर पद्धत येथे अस्तित्वात आहे. ती व्यवस्था मोडण्याची ताकद कुणातही नाही. यावरच जो आळा घालणार, तोच माझ्या मते राजा ठरणार?

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# अश्लीलतेवर 'सुप्रीम' प्रहार

काही दिवसांपूर्वी माननीय सर्वोच्च न्यायालयाने विविध ओटीपी प्लॅटफॉर्म व समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अश्लील साहित्याबद्दल नाराजी व्यक्त करत सरकार व ओटीटी प्लॅटफॉर्म जसे की उल्लू, नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राईम, मुबी, एएलटी बालाजी व समाज माध्यमे जसे की एक्स कॉर्प, गूगल, मेटा इंक व ॲप्पल यांना करणे दाखवा नोटीस दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर दाखविण्यात येणाऱ्या अश्लील सामुग्रीला गंभीर व चिंताजनक मानलेले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची शाई वाळते न वाळते तोच एजाज खान याच्या उल्लू ॲपवरील 'हाऊस अरेस्ट' या कार्यक्रमाची एक व्हिडीओ क्लिप समाज माध्यमांवर चर्चेचा विषय झाली. या व्हिडीओमध्ये एजाज खान त्याच्या कार्यक्रमात काम करणाऱ्या अर्धनग्न महिला स्पर्धकांना किमान कपडे ठेवायला सांगत होता. त्याचप्रमाणे स्पर्धकांना म्हणजे महिला व पुरुष स्पर्धकांना योगासनांच्या माध्यमातून काम संदेश द्यायला सांगत होता. ज्यावेळेस लोकांनी ही व्हिडीओ क्लिप पाहिली त्यावेळेस प्रेक्षकांनी सुद्धा याच्यावर प्रचंड टीका केली. महिला आयोगाने सुद्धा त्याच्यावर टीका केली. तसेच राजकीय नेत्यांनी सुद्धा यावर प्रचंड टीका व नाराजी व्यक्त केली. त्यानंतर उल्लू ॲपवरून 'हाऊस अरेस्ट' कार्यक्रमाचे सर्व भाग काढून टाकण्यात आले. आजपासून तीस वर्षांपूर्वी अशा पद्धतीचे ओटीपी ॲप किंवा समाज माध्यम नव्हते. त्यावेळेस इंग्रजी सिनेमांमधून अशा पद्धतीची दृश्ये दाखविली जायची व काही ठरावीक सिनेमागृहांमध्ये ते प्रदर्शित व्हायचे. अशा चित्रपटगृहांत जाणाऱ्या प्रेक्षकांकडे लोक चांगल्या नजरेने पाहत नव्हते. हळूहळू व्हीसीआर आले व त्यावर अशा पद्धतीच्या सिनेमांचे शौकीन सिनेमे पाहू लागले. परंतु अशा पद्धतीचे सिनेमे व त्याच्या कॅसेट यावर सुद्धा सार्वजनिक बंदी होती. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अशा पद्धतीचे प्रदर्शन होत नव्हते. यामध्ये एकांतात किंवा चोरून लपून पाहणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. त्यानंतर डीव्हीडी प्लेयर आले. पातळ चकत्या असलेल्या डीव्हीडी सर्वत्र चौकाचौकात विकायला ठेवल्या जाऊ लागल्या. यामध्ये अशा विषयांच्या डीव्हीडीची संख्या पण मोठी असायची. ज्यांना बघायचे आहे ते रस्त्यावरून अशा डीव्हीडी विकत घेत होते व घरी जाऊन एकांतात बघत होते. व्हीसीआर व डीव्हीडी प्लेयर यांच्या काळात कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या खोलीवर आणून ते बघायला सुरुवात केली. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा खूप मोठा पैसा अशा पद्धतीचे सिनेमे निर्माण करणे, प्रदर्शित करणे व भारतातील तरुणांपर्यंत डीव्हीडीच्या माध्यमातून पोहोचविणे यामध्ये लागला होता असे त्यावेळी बोलले जात होते.



जी पायवाट होती तिची कुठे गाडीवाट झाली व तिचे नंतर महामार्गात रूपांतर झाले. म्हणजे जे पूर्वी लोक चोरून लपवून करत त्या मार्गावर देशातील तरुणाई चालू लागली व त्याचे लोण सर्व महाविद्यालयांत पसरत आज त्याचा महामार्ग झालेला आहे. आता याही गोष्टी जुन्या झालेल्या आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म कधी सुरू झाले हे लोकांना समजलेही नाही. समाज माध्यमांवर अश्लील सामुग्री हळूहळू पाठविता पाठविता लोकांना त्याची सवय लावली गेली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून एकदा जर तुम्ही अशा पद्धतीची सामुग्री पाहणे सुरू केले तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून त्यांना समजते आणि तुम्हाला तशाच पद्धतीची सामुग्री वारंवार पाठविली जाते आणि मग तुम्ही नकळत अशी सामुग्री पाहण्याच्या अधीन होऊन जाता. तुम्हाला त्याची सवय लागून जाते.

जे पूर्वी वयस्कर लोक पाहायचे ते त्यानंतर तरुण पिढी पाहायला लागली व काही वर्षांपूर्वी ज्या गोष्टी तरुण पिढी पाहायची आज त्या गोष्टी शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनी बघत आहेत. त्यामुळे आता या सर्व सामुग्रीचे उपभोक्ता शालेय विद्यार्थी, तरुण विद्यार्थी, वयस्कर व वृद्ध सुद्धा झालेले आहे. या सर्व गोष्टींचे अतिशय दूरगामी परिणाम आहेत. ही सर्व सामुग्री पहिल्यामुळे मनामध्ये विशिष्ट गोष्टींचे जागरण व चिंतन सुरू होते. सातत्याने तेच चिंतन असल्यामुळे त्या गोष्टींचा आग्रह वाढतो व त्यातूनच अपराध निर्माण होतात. आज आपण पाहतो की अशा पद्धतीच्या अपराध्यांच्या शृंखलेमध्ये अल्पवयीन विद्यार्थ्यांपासून ते वृद्ध लोकांपर्यंत सर्वांचाच समावेश आहे. अशा साहित्याचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक सर्वच प्रकारचे परिणाम आहेत. आज इतके वर्ष झाले या सर्व गोष्टी चालू आहे परंतु सामाजिक संकोचाने असो किंवा कशानेही परंतु या गोष्टी उघडपणे भाषणांमधून मांडायला कोणी तयार नाही. लेखांमधून फारसे लिखाण सुद्धा या विषयावर झालेले दिसत नाही. प्रत्येकाला वाटते की मी या विषयाला हात का घालावा परंतु या विषयाला हात घालणे हे सामाजिक कार्यच आहे. ज्यांची बुद्धी, ज्यांचे मन अशा पद्धतीच्या गोष्टींच्या आहारी गेलेले आहे ते विद्यार्थी अभ्यासामध्ये कोणते मोठे चमत्कार घडवून आणू शकतील? त्यांची बुद्धी कोणते नवीन शोध लावू शकेल? त्यांचे शरीर देशांच्या शत्रूशी कसे लढू शकेल? भारत हा ज्ञानामध्ये रत असलेल्या लोकांचा देश आहे. परंतु आजचे विद्यार्थी आणि तरुण जर याच गोष्टींमध्ये राहत असले तर ते स्वतःचे करीअर सुद्धा बनवू शकणार नाही आणि त्यांचे भविष्य सुद्धा अंधकारमय राहील. अशा विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांना सुद्धा फार त्रास सहन करावा लागेल. या सर्व गोष्टींचा सामाजिक मूल्यांवर सुद्धा खूप मोठा प्रभाव पडणार आहे आणि पडत आहे. समाजामध्ये देशातून, विदेशांतून शिरणाऱ्या अशा सर्वच गोष्टींचे राजकीय व सामाजिक नेतृत्वाकडून चिंतन व्हायला पाहिजे. विशेषतः समाजामध्ये संस्कार आणि सत्प्रवृत्तीचे जागरण करणाऱ्या संस्थांनी तर याच्यावर विचार आणि क्रिया करण्याची नितांत आवश्यकता आहे. आता इतका उशीर झाल्यावर जनहित याचिका दाखल झाली. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालयाने आपले मत मांडले व कारणे दाखवा नोटीस पाठविली. परंतु इतके दिवस हा जो धांगडधिंगा, हैदोस सुरू होता त्याच्यावर सर्वच लोक मौन पाळून होते. महिलांची सामाजिक सुरक्षा या विषयावर जे अनेक लोक बोलतात, लिहितात त्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण आहे याचा विचार आवश्यक आहे.

एखाद्या ठिकाणी चोर चोरी करताना दिसला तर त्याला पकडले पाहिजे. पकडू नसेल शकत तर पोलिसांना कळविले पाहिजे. तेही करू शकत नसेल तर चोर चोर म्हणून ओरडले पाहिजे. मोहल्ल्यातील लोकांना जागे केले पाहिजे. न्यायालय, सरकारी यंत्रणा, प्रशासन त्यांचे काम करीलच परंतु त्यांची वाट न पाहता समाजाने सुद्धा जे चुकीचे होत आहे त्यावर बोलले पाहिजे, लिहिले पाहिजे व समाज जागृतीचे काम सुरू ठेवले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती सुद्धा! माणसांचे स्वभाव वेगळे, आवडीनिवडी वेगळ्या, त्यामुळे आज आपण बघतो की प्रत्येक घरात काही ना काही कुरबुरी, भांडण असतात. प्रत्येकच व्यक्ती मीच बरोबर आणि समोरचा चूक असं गृहीतक मांडत असतो. समाजात, राजकारणात सगळीकडे विचारांच्या देवाणघेवाणीपेक्षा वादविवाद आणि भांडणच जास्त दिसतात. या सगळ्यात आपण खळखळून हसणं विसरूनच गेलो आहे. त्यामुळे स्वास्थ्य हरवून बसलो आहे. असं का होतंय? सगळ्यांची सहनशक्ती संपली का? की आपल्यातला अहंकार आणि आपल्या स्वभावातले दोष याला कारणीभूत आहेत? होय नक्कीच! वरील सर्व समस्यांचं मूळ हेच आहे. अहंमुळे कोणीच माघार घ्यायला तयार होत नाही. तर स्वभावदोषांमुळे मनुष्य सदसद्विवेक हरवून बसतो. आपण स्वतः स्वतःचे आत्मपरीक्षण केले तर लक्षात येईल की, राग, लोभ, द्वेष, ईर्ष्या, स्पर्धा यांनी आपण अगदी काठोकाठ भरलो आहोत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्याला किती राग येतो आणि त्याची कोणती कारणे आहेत. हे लिहून काढले तर सहजच त्याची तीव्रता लक्षात येईल. आज प्रत्येक व्यक्ती घरातल्या भांडणामुळे वैतागला आहे. त्यातून आत्महत्या, निराशा, आजारपण यांनी आपल्याला कवटाळले आहे. नवीन पिढीत तर घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. त्यामुळे मुलांवर संस्कार नाही. आई-वडिलांचे प्रेम नाही. त्यांचा वेळ मिळत नाही आणि आपसूकच त्यांच्यात सगळ्या दोषांचा शिरकाव होतो. यासाठी आपणच आपले दोष ओळखू या. अहं कमी करूया आणि आनंदाने जगूया! म्हणजे भारताचे आनंदाच्या यादीतले स्थान नक्कीच वर जाईल. घर आनंदी, तर समाज आनंदी आणि त्यामुळे देश आनंदी.

**माधवी पत्की**/नागपूर

●● ●●

### समृद्धी महामार्गावरील वाढते अपघात चिंताजनक

मागील तीन-चार महिन्यांत समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या घटली होती. मात्र एप्रिल महिन्यापासून अपघातांची संख्या वाढली. तसेच वाहनांनी पेट घेण्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या मार्गावर उन्हाळ्यात वाहन चालविताना चालकांनी खूप सावध राहावे. गाडीचे टायर लवकर तापतात म्हणून गाडी खूप भरधाव चालविणे टाळावे. रात्री वाहन चालविताना झोप येणे किंवा डुलकी लागून अपघात वाढले आहेत. याबाबत चालकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी. चालत्या वाहनाला आगी लागण्याचे प्रकारही खूप वाढले आहेत.

या मार्गावर आग विझविण्यासाठी ज्या अग्निशमन दल गाड्या आहेत त्यांनी सतर्क राहावे, शक्य असल्यास अग्निशमन दल गाड्या वाढवाव्यात. या मार्गावर अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी म्हणून रुग्णवाहिका व इतर वैद्यकीय साहाय्यही उपलब्ध असते, त्यांनी ही सावध राहून तात्काळ मदत करावी. समृद्धी महामार्गवर पोलिस यंत्रणा मोठ्या प्रमाणात सतर्क राहते. ते तत्काळ अपघातस्थळी धाव घेऊन मदत करतात. या सर्व बाबी व महामार्ग शेजारी असलेले ग्रामस्थ यांनी अपघातग्रस्त साहाय्यासाठी सतर्क रहावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### खाजगी शिकवण्यांना नियम आवश्यक

आजकाल खाजगी शिकवण्यांचे फॅड खूप वाढले आहे. शाळेतून खरे म्हणजे १०० टक्के शिक्षण व्हायला पाहिजे, पण ते दुर्दैवाने होत नाही. ते झाले तर खाजगी शिकवण्यांचे धंदे चालणार नाहीत. गरीब कुटुंबांना दोन किंवा जास्त मुले असणाऱ्यांना शिकवणे खूपच जड जाते. शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक वगैरे या बाबतीत हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत आहेत, असे म्हणायला बराच वाव आहे.

बरं, शासन, जिल्हा परिषदा यांचे तर याकडे सपशेल दुर्लक्ष आहे. देश घडविणे व देशाची व्यापक विकासाच्या दिशेने वाटचाल होण्यासाठी शासन व इतर जबाबदार संस्थांनी याकरिता काही पावले उचलणे सध्या तातडीचे झाले आहे. शाळांतूनच शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे, जे शिक्षक शिकवणी वर्ग चालवू इच्छितात, त्यांची नोंद सरकार दरबारी व त्यांच्या शाळांत होणे आवश्यक आहे, शिकवणीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची फी किती असावी, याबाबत सरकार दरबारी नियंत्रण व नोंद असावी, शिकवणी वर्गात शिकवल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता किती आहे, यावर शासनाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे.

या व इतर आवश्यक बाबींचा विचार करूनच पाल्यांनी आपल्या मुलांना शिकवणी वर्गात घालावे. केवळ पैसे आहे म्हणून मुलांना शिकवणी वर्गात टाकणे, म्हणजे आपली जबाबदारी टाळणे होय.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

संक्षिप्त

## डॉ.सुजित विष्णू शिंदे यांना बी.ए.एम.एस.पदवी प्रदान

### डॉक्टर पदवी संपादन करत गावच्या मातीचा अभिमान वाढवला !

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन /प्रतिनिधी**

संगमनेर येथील सिद्धकाला महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात भोकरदन तालुक्यातील डॉ.सुजित विष्णू शिंदे यांना बी.ए.एम.एस.पदवी प्रदान करण्यात आली.डॉ.सुजित विष्णू शिंदे हे डॉ. विष्णु भिका शिंदे यांचे चिरंजीव आहेत.त्यांनी विविध परिस्थितीचा सामना करत हे यश संपादन केले.आपल्या जिद्द,चिकाटी आणि कष्टावर विश्वास ठेवून डॉ.सुजित शिंदे यांनी हे सिध्द करून दाखवले की,परिस्थिती कितीही प्रतिकूल असली ,तरी प्रयत्नांनी




यश नक्की मिळते.त्यांच्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.त्यांनी ग्रामीण भागातील युवकांसमोर एक प्रेरणादायक उदाहरण ठेवले आहे.' परिस्थितीवर मात करून यश मिळवायचे असेल तर आत्मविश्वास कष्ट आणि जिद्द गरजेची असते.'असे डॉ.सुजित शिंदे म्हणाले.प्रसिद्ध उद्योजक सचिन पिसे व डॉ विष्णु भिका शिंदे यांचे चिरंजीव डॉ सुजित विष्णू शिंदे यांना संस्था प्रमुख डॉ.नैमिष सराफ,प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध आयुर्वेदिक चिकित्सक डॉ.रामदास आव्हाड व प्राचार्य डॉ.खडे यांच्या हस्ते बी.ए.एम.एस पदवी प्रदान करण्यात आली.यावेळी उद्योजक सचिन पिसे डॉ.मयूर पिसेसह कुटूंब उपस्थित होते.

## आचार्य विद्यासागरजींच्या फोटोशी छेडछाड करून अवमान; सकल जैन समाज संतप्त

==========

### आरोपीविरुद्ध सायबर कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी

================

जालना/प्रतिनिधी : जैन दिगंबर संत आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या फोटोमध्ये मोर्फिंग करून अपमान केल्याच्या प्रकाराने जालना जिल्ह्यातील सकल जैन समाजात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित दोघा आरोपींवर सायबर कायद्यानुसार व भारतीय दंड संहिता कलम ३५६ अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात सोमवार दि. ५ मे रोजी सकल जैन समाजाच्या शिष्टमंडळाने अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बामणराव पीठमांगे आणि ज्ञानेश्वर भागाजी गाडे या दोघांनी त्यांच्या फेसबुक खात्यावर आचार्य विद्यासागरजी यांच्या फोटोचे स्वरूप बदल करून तो फोटो प्रसारित केला आहे. त्यात भाजपचे नेते नितेश राणे यांचा चेहरा



पूज्य आचार्यश्रींच्या शरीरावर मास्क करून लावण्यात आला. या कृतीमुळे संताच्या प्रतिमेचा अवमान झाला आहे. आचार्य श्री विद्यासागरजी महाराज हे जैन समाजाचे श्रद्धास्थान असून त्यांनी समाजहितासाठी अनेक कार्ये केली आहेत. त्यांचा प्रभाव केवळ धार्मिक मर्यादेत न राहता सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आहे. पंतप्रधान, राष्ट्रपती आणि लोकप्रतिनिधींदेखील वेळोवेळी त्यांचे आशीर्वाद घेत असत. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, अशा या भूमीत संताचा अपमान हा केवळ एका व्यक्तीचा नव्हे तर संपूर्ण समाजाचा अपमान असून, या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावल्या असून समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे, ही बाब विचारात घेता आरोपींवर कडक कायदेशीर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याची दक्षता घेण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देताना संजयकुमार लव्हाडे, ॲड. ऋषभचंद माद्रप, महेंद्र सावजी, दिलीप बाकलीवाल, राजेंद्र काला, योगेश पाटणी, अनुप डोणगावकर, वैभव मेहत्रे, सोमेश ढोले, प्रतीक पहाडे, पारस अमहिंद्रकर, प्रेमचंद कासलीवाल, धनराज जैन, पवन ढालावत, विजय जैन आणि समाज बांधवांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांना मागणीप्रमाणेच बियाणे खते औषधी पुरवठा करावा आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

खरीप हंगाम नियोजन करून आढावा बैठकीत आ. खोतकर यांच्या सूचना शेतकऱ्यांचा महत्वाचा खरीप हंगाम जवळ आलेला असून पाऊस देखील जवळ येऊन ठेपलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्याला लागणारे बी बियाणे व कीटकनाशके व पीक कर्ज संदर्भात अधिकारी कर्मचाऱ्यांनी आतापासूनच तयारीला लागावे व शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना बी बियाणे खते औषधी पिक कर्ज पुरवठा करण्यासाठी तयारीत राहावे अशा स्वरूपाच्या सूचना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना दिल्या. आज दिनांक पाच मे २०२५ रोजी तहसील कार्यालय जालना येथे जालना विधानसभा मतदारसंघाची खरीप हंगाम नियोजन पूर्व आढावा बैठक आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,माजी सभापती पांडुरंग डोंगरे ,पंचायत समिती सदस्य जनार्दन चौधरी ,रामकिसन कांयदे तहसीलदार छाया पवार ,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कापसे, तालुका कृषी अधिकारी राठोड, सहाय्यक निबंधक हुसे आदी मान्यवरासह जालना विधानसभा मतदारसंघातील मंडळ अधिकारी कृषी अधिकारी, कृषी सहायक ,ग्रामसेवक, तलाठी इत्यादींचे उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खोतकर म्हणाले की जालना शहर हे बियाण्याची राजधानी असून या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणे बियाण्याचा साठा उपलब्ध आहे. परंतु काही काही ठिकाणी बी बियाणे व औषधेंची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना फसविण्याचा प्रकार होण्याची शक्यता ना करता येत नाही. त्यासाठी बी बियाणे व इतर वस्तूचा



काळाबाजार होणार नाही या संदर्भात बैठकीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना करण्यात आल्या ,असे आढळून आल्यास कोणालाही माफ करण्यात येणार नसून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा देखील आमदार खोतकर यांनी दिला, त्याचप्रमाणे या खरीप हंगामामध्ये बँकांनी देखील शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. मागेल त्या शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करण्यासाठी आतापासूनच कामाला लागावे. शासनाकडून देखील शेतकऱ्यांसाठी मोफत बियाण्याचा पुरवठा केला जातो तो सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचवीण्याचे काम अधिकारी कर्मचाऱ्यांनी करावे या कामात देखील दिरंगाई होता कामा नये अशा सूचना देखील आमदार खोतकर यांनी दिल्या. या कामी दिरंगाई आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देखील बैठकीत देण्यात आला.

## महात्मा बसवण्णा यांनी विषमता संपविली - ॲड.निळकंठ ताकबीडकर





**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी / मंठा**

लोकशाही जनक ,समतानायक,महात्मा बसवण्णा यांनी सामाजिकसमतेसाठी लोकशाही जनक ,समतानायक,महात्मा बसवण्णा यांनी सामाजिक समतेसाठी अविरतपणे परिश्रम केले.अनुभव मंटप आणि वचन साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समतेचा लढा उभा केला. लिंगायत संस्कृती व शरण साहित्य लोकाभिमुख होणे काळाची गरज असल्याचे विचार मंठा येथील लिंगायत धर्म संस्थापक महात्मा बसवण्णा जयंती समारंभात बोलताना ॲड.निळकंठ ताकबीडकर यांनी व्यक्त केले.ते पुढे बोलताना म्हणाले महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम असेल की मग जातीअंताचा लढा उभारून सर्व समाजातील घटकांना न्याय देणारी व्यवस्था बाराव्या शतकात महात्मा बसवण्णा यांनी निर्माण केली ती आजही देशाला नाही तर जगाला सर्वकाळ मार्गदर्शक ठरणारी आहेत. समतानायक महात्मा बसवण्णा यांच्या जयंतीच्या निमित्ताने मंठा येथे लिंगायत समाजाच्या वतीने भरगच्च विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.त्यानंतर सायंकाळच्या सत्रात टाळ-मृदंगाच्या गजरात भव्य शोभा मिरवणूक काढण्यात आली यात महिला-पुरूष शरण मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.मिरवणुकीचा समारोप लक्ष्मी नारायण मंदिराच्या परिसरात ॲड.ताकबीडकर यांच्या व्याख्यानमालेने झाला. व्याख्यानमालेच्या समारंभाच्या अध्यक्षतेस्थानी बसवपिठावर मंठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संतोष माळगे हे होते.तसेच नगर पंचायत मंठा नगराध्यक्ष श्री वैजनाथनाना बोराडे, माजी नगराध्यक्ष नितीनसेंठ राठोड, राट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नितीन जेथलिया, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्, माजी सभापती किसनराव म मोरे यांच्यासह सर्व स्तरावरील नागरीकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.यावेळी सदरील जयंती समारंभात पंचक्रीशीतील भजनी मंडळी,समाज बांधवाची लक्षणीय उपस्थिती होती. सदरील कार्यक्रम यशस्वी घडवून आणण्यासाठी जयंती उत्सव समितीसह सर्व समाजबांधवाच्या परिश्रमातून अतिशय वैचारिक, सुसंस्कृत जयंती समारंभ संपन्न झाला.

## सुधाकरराव देशपांडे यांचे दुःखद निधन

जालना/प्रतिनिधी : परतूर येथील रहिवासी आणि परतूर पंचायत समितीचे सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी सुधाकरराव भालचंद्रराव देशपांडे (दुधेकर) यांचे दीर्घ आजाराने शनिवार दि. ३ मे रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे ६९ वर्ष होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सून, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर परतूर येथे संस्कार करण्यात आले.



## बेकायदेशीर बालगृहे, अनाथाश्रम, वसतिगृहे आढळुन आल्यास शासनास कळविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येऊन त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच रुपये १ लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद नमुद करण्यात आलेली आहे. आपल्या आसपासच्या परिसरामध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ यावर संपर्क साधून बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे असे जाहिर आवाहन नयना गुंडे आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

# पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सतिष घाटगेंचा अल्टिमेटम

### दोन दिवसात बंधाऱ्यात पाणी सोडा, नसता ७ मे रोजी तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड /प्रतिनिधी**


: अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावरील गावांमध्ये दुष्काळाची दाहकता वाढली आहे. पाथरवाला, शहागड, मंगरूळ, शिवणगाव, जोगलादेवी येथील बंधारे पूर्णपणे कोरडे पडल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहेत. अशा स्थितीत पाटबंधारे विभाग पाणी सोडण्यास टाळाटाळ करत आहे. दोन दिवसांपूर्वी उजव्या कालव्याची सीआरगेट उघडून पाणी खुली करणारे सतीश घाडगे यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देत निर्वानिचा इशारा दिला आहे दोन दिवसात अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील बंधाऱ्यांमध्ये पाणी न सोडल्यास सात मे रोजी शेतकऱ्यांसोबत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी निवेदनात दिला आहे. अंबड घनसांगी तालुक्यातील गोदाकाच्या गावाततील शेतकऱ्यांची पिके आणि फळबागा उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याअभावी जळून खाक होत आहे.जनावरांना चारा आणि पाणी मिळत नसल्याने त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली




आहे. दोन दिवसांपूर्वी संतप्त शेतकऱ्यांनी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली उजव्या कालव्याचे सी.आर. गेट उघडून प्रशासनाला आपल्या असंतोषाची झलक दाखवली. त्यानंतरही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याच्या हालचाली केल्या नाही. या गंभीर परिस्थितीमुळे त्रस्त झालेल्या गोदाकाठच्या शेतकऱ्यांसाठी सतीश घाटगे यांनी सोमवारी जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांची भेट घेऊन तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली. जर येत्या दोन दिवसांत जायकवाडीच्या उजव्या व डाव्या कालव्यातून या बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याचे आदेश निर्गमित केले नाही,तर दोन्ही तालुक्यातील हजारो शेतकरी येत्या ७ मे रोजी जायकवाडी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. यावेळी भाजपा तालुका प्रमुख शिवाजी मोरे, पुरुषोत्तम उढाण , राजेंद्र छल्लारे उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या या मागणीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तळणी गावात ग्रामस्वच्छता आणि निबंध स्पर्धेने 'कृषी संजीवनी' उपक्रमास उत्साही प्रतिसाद !







**तभा वृत्तसेवा**
**तळणी/ प्रतिनिधी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत लोकसहभागातून सूक्ष्म नियोजनाच्या तिसऱ्या दिवशी तळणी येथे सोमवारी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात बस स्टँड परिसरात ग्रामस्वच्छता अभियानाने करण्यात आली. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्वच्छता अभियानासाठी तळणीतील डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानात सरपंच गौतम सदावर्ते, ग्रामपंचायत सदस्य , ग्रामसेवक राजेंद्र डोईफोडे , कृषी सहाय्यक विजय खोडके, तलाठी प्रशांत हरिश्चंद्रे , आदींनी सहभाग घेतला. स्वच्छतेनंतर जमा झालेला कचरा जेसीबीच्या साहाय्याने उचलून घंटागाडीने योग्य ठिकाणी नेण्यात आला. यानंतर शालेय विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या स्वप्नातील गाव' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतून तीन विजेते निवडण्यात आले असून त्यांचा गौरव समारोप सोहळ्यात ७ मे रोजी केला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेतून ग्रामविकासाविषयी मांडलेल्या भावना ऐकून ग्रामस्थ भारावून गेले. या दिवशी गावातील दोन विहिरींची पाणी पातळी मोजण्यात आली, तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असलेले दोन माती नमुनेही घेण्यात आले. दिवसाचा समारोप शिवार फेरीने करण्यात आला.

## महसूल प्रशासन व गोंदी पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत अंदाजे चाळीस लाखांचा ऐवज जप्त !

**तभा वृत्तसेवा**
**अंबड /प्रतिनिधी**

माननीय जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाने तसेच माननीय अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार मॅडम यांच्या मार्गदर्शना यज्ञने काल रात्री मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आज पहाटे साडेचार वाजल्याच्या दरम्यान मौजे सिद्धेश्वर फाटा येथील गोदावरी नदीपात्रात एक रीतीने भरलेला हायवा पकडून जप्त करण्यात आला व पोलीस ठाणे गोंदी येथे रेती चोरी रेती वाहतूक व संचारबंदीचा भंग तसेच विविध प्रचलित कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला

सदर गुन्ह्यामध्ये तीन आरोपी अटक असून सदर वेळी लोकेशनदेणारेएकव्यक्तींनापणअटककरण्यातआलीआहे.

त्यासोबतच लोकेशन देणाऱ्या व्यक्तीचे मोबाईल व मोटरसायकल जप्त करण्यात आली

त्याचबरोबर रेती चोरी करणाऱ्या व त्याला सहकार्य करणाऱ्या एका व्यक्तीस व एक चार चाकी वाहन हे जप्त करण्यात आलेले आहे असेमिळूनएकूण४०लाखाचाऐवजजप्तकरण्यातआलाआहे

पुढील दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे

सदर कार्यवाही दरम्यान तहसीलदार विजय चव्हाण सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर व त्यांची टीम त्याचबरोबर मंडळाधिकारी जायभाय , रमेश वालेकर व राजेश चव्हाण हे सोबत होते



सदर वेळी कारवाई करत असताना लोकेशन मिळू नये म्हणून खाजगी पाहणामार्फत सदर ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु रेती घाटाजवळ येत असताना लोकेशन सांगणाऱ्या खबऱ्यामार्फत लोकेशन फूठल्या मुळे पोहोचण्यापूर्वीच ट्रॅक्टर लोडर हे अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले

त्यासोबतच पोहोचण्या अगोदर काही वाहने सुद्धा पळून गेल्याचे दिसून आले नदीपत्रात संचारबंदी लागू करण्यात आलेली असल्याने कोणीही विनापरवाना हायवा ट्रॅक्टर अथवा रेती चोरी करण्याकरता गेल्यास संबंधिताविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल याची गंभीर नोंद घेण्यात यावी.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचाऱ्यांचे समावेशन करा

## अभियानातील अधिकारी, कर्मचारी यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १० वर्षे पूर्ण झालेल्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचे महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये समायोजन करणेकरिता दि १४ मार्च २०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार मंजूरी देण्यात आली होती. परंतू अजूनही हिंगोली जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचे समायोजन केलेले नाही. तत्काळ ही कार्यवाही करावी या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांचे निवेदन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अधिकारी, कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाला सादर केले आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासनामार्फत मंजूर असलेल्या विविध मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि ५ मे रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत शासनाला निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये १० वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या परिपत्रकानुसार शासनाच्या सेवेत समायोजन करण्यात यावे, जुने आणि नवीन कर्मचाऱ्यांच्या मानधनात असलेली तफावत दुर करून मानधनवाढ निश्चित करावी, नवीन वेतन सुसुत्रीकरण धोरण, शैक्षणिक पात्रता व कामाची जबाबदारी या अनुषंगाने निश्चित करावी, सन २०२४-२५ च्या मंजूर कृती आराखड्यानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या ६०० अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन फेब्रुवारी २०२५ पासून अनुदानाअभावी अदा करण्यात आले नाही त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. याबाबत पाठपुरावा करूनही अद्याप अनुदान मिळाले नाही. तसेच समुदाय आरोग्य अधिकारी यांचे कामावर आधारीत मोबदला माहे नोव्हेंबर २०२४ पासून प्रलंबीत आहे. तसेच आशा स्वयंसेविका यांचेही कामावर आधारीत मोबदला डिसेंबर २०२४ पासून प्रलंबीत आहे. सदरील मागण्या तत्काळ मंजूर कराव्यात अन्यथा दि ७ मे पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणारे अधिकारी व कर्मचारी सामुहीक रजेवर जाणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# रामलीला मैदानावर दारू पिणाऱ्यांवर होणार कारवाई

## उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडेंचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या रामलीला मैदानावर रात्री अंधाराचा गैरफायदा घेत काळी समाजकंटक दारू पिऊन तिथेच बाटल्या आणि इतर साहीत्य टाकून जात आहेत. त्यामुळे या मैदानावर सराव करणाऱ्या खेळाडुसह मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी यांनी महसुल विभागाच्या अधिकारी व कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी यांची बैठक घेत त्यांना अशाप्रकारच्या व्यक्ती आढळल्यास त्यांच्या गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

रामलीला मैदानावर महसुल प्रशासनाने स्वच्छता करून त्याठिकाणी काही वर्षापूर्वी वॉकींग ट्रॅक बांधले आहेत. तसेच खेळाडूना खेळण्यासाठी हे मैदान खुले केले होते. या मैदानावरील अतिक्रमणे काढून संरक्षण भिंतही बांधण्यात आली आहे. परंतु रात्री अंधाराचा गैरफायदा घेत काही समाजकंटक आणि तळीराम या मैदानाचे पावित्र्य नष्ट करीत आहेत. याठिकाणी दारू पिऊन बाटल्या फोडल्या जात आहेत. तसेच मैदानाचे गेटही समाज कंटकांनी तोडून टाकले होते. यासंदर्भात मैदानावर सरावासाठी येणाऱ्या खेळाडू तसेच नागरिकांनी आवाज उठवला होता. त्यानंतर महसूलच्या पथकाने पुन्हा या मैदानाचे गेट बसवले आणि कुलुप लावले.

दरम्यान, काही खेळाडू आणि नागरिक सकाळी गेले असता त्यांना मैदानात जाण्यापासुन रोखण्यात आले होते. यावेळी खेळाडूनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मैदानावर सराव करू दिल्या जात नसल्यामुळे तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. यासंदर्भात पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे आणि तहसीलदार भूजबळ यांना सविस्तर माहीती दिली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांनी महसूल अधिकारी, कर्मचारी तसेच पोलिस विभागाची बैठक घेत या मैदानात दारू पिणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# डॉ. हेडगेवार दंत महाविद्यालयात दातांच्या गंभीर आजारावर उपचार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**



शहरानजीक वाशिम रस्त्यावर असलेल्या डॉ हेडगेवार स्मृती रूग्ण सेवा मंडळ दंत महाविद्यालयात दातांच्या दुर्धर आजारांवर आता अत्याधुनीक यंत्रांद्वारे उपचार केले जात असून याचा लाभ शहरासह ग्रामीण भागातील रूग्ण मोठ्या संख्येने घेत असतांना दिसत आहेत.

शहरातील सुप्रसिध्द उद्योगपती स्व ब्रिजलाल खुराणा यांनी बासंबा फाटा येथे डॉ हेडगेवार स्मृती रूग्ण सेवा मंडळ दंत महाविद्यालयाची स्थापना केली आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठी तसेच गोर-गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी माफक दरात दातांचे आजारावर उपचार व्हावेत या उद्देशाने त्यांनी या महाविद्यालयाची स्थापना केली आहे. या महाविद्यालयात आता मोठ्या संखयेने ग्रामीण आणि शहरी भागातील दातांचे रूग्ण उपचारसाठी येत आहेत. तसेच या महाविद्यालयातून हजारो दंत चिकीत्सक तयार होत आहेत.

डॉ हेडगेवार दंत महाविद्यालयात ११० खाटांचे इस्पितळ आहे. येथे गरीब, मध्यमवर्गीय रूणांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळत आहेत. दवाखान्यात अत्याधुनिक यंत्र सामुग्री तसेच तंत्रज्ञान उपलब्ध आहेत. तसेच प्रशिक्षित दंत चिकीत्सक तसेच भावी दंत चिकीत्सक यांची मोठी संख्या आहे. त्यामुळे भरती झालेल्या रूग्णांवर तत्काळ उपचार सुरू करण्यात येत आहेत. उपप्राचार्य डॉ तिलक, दंत चिकीत्सक डॉ बेग यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो दंत रूग्णांना उपचार मिळत आहेत. रूट कॅनॉल, इनप्लांट, मुख कर्करोग यांसारख्या दूर्धर आजारावरही माफक दरात आणि तत्काळ उपचार होत आहेत.




**हिंगोली– सगुणा रूरल फाऊंडेशन नेरळ आणि उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी पुनर्निर्मित तंत्रज्ञान व वन्य प्राण्यांपासून पीक, पशुधन व मनुष्यहानी जनजागरण प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उगमचे अध्यक्ष जयाजीराव पाईकराव, मार्गदर्शक चंद्रशेखर भडसावळे, परशुराम अगविले, सतीश खाडे आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### स्वराली चव्हाण हिची उल्लेखनीय कामगिरी




हिंगोली-येथील 'पोद्दार इंटरनॅशनल स्कूल'मध्ये शिकत असलेल्या कु. स्वराली विनोद चव्हाण हिने 'डोंबिवली २०२५' मध्ये आयोजित राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत भाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राज्य स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून तिने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी प्रवेश मिळवला होता. या स्पर्धेत स्वराली हिने स्वच्छ भारत-सुंदर भारत व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर आधारित चित्रांची निर्मिती केली. तिच्या चित्रांचे संकलन, संकल्पना व सादरीकरण विशेष ठरले. राष्ट्रीय स्तरावर तीच्या चित्रांची निवड होऊन तिला मान्यवरांच्या हस्ते गोल्ड मेडल व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील तिच्या या यशाबद्दल अखिल भारतीय राष्ट्रीय परिषद च्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष एम. एम. रहाटे, प्रसिद्ध शैक्षणिक लेखक प्रकाश ठाकूर, प्राचार्य अर्चना देशपांडे उप प्राचार्य व स्टाफ, सेवानिवृत्त विभागीय आयुक्त कृष्णा भोगे, हिंगोली येथील आकाशवाणी व दूरदर्शनचे सेवानिवृत्त प्रतिनिधी डॉ. विजय निलावार, ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे जिल्हाध्यक्ष ॲड आर एन अग्रवाल, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित एम एम राऊत, बाल संरक्षण समितीचे सदस्य परसराम हेंबाडे, विनोद व वैशाली चव्हाण, बालाजी राऊत, माजी प्राचार्य विक्रम जावळे, प्रकाश ठाकरे आदींनी तिचे विशेष कौतुक करून आशीर्वाद दिले आहेत.

### सुकळीवीर येथे क्षुल्लक कारणावरून मारहाण

हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील सुकळीवीर येथे ढकलून का दिले या क्षुल्लक कारणावरून चौघांनी दोघांना लाठ्या काठ्यांनी जबर मारहाण केल्याची घटना घडली असून याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुकळीवीर येथील विनोद उत्तम शितळे हे त्यांच्या कुटुंबियांसह मागील १० वर्षापासून पुणे येथे रोजमजुरी करतात. सुकळीवीर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्यामुळे ते गावी आले होते. दि २ मे रोजी विनोद शितळे व राधाकिशन लक्ष्मण शितळे हे दुचाकीने वारंगा फाटा येथील कामे आटोपून गावी येत असतांना अजय बंडू खुपसे, रोहीत गोरख पंडीत, सोनबा खंदारे, विशाल बंडू धुमाळे यांनी त्यांची दुचाकी थांबवून हातातील लाकडाच्या काठ्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. यावेळी विनोद शितळे यांनी मारहाणीचे कारण विचारले असता तू मला गावात काल ढकलुन का दिले या कारणावरून चौघांनी लाठ्या काठ्यांनी विनोद शितळे यांना जबर मारहाण केली. तसेच गावात आल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी विनोद शितळे यांच्या तक्रारीवरून आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शांताबाई दराडे विद्यालयाचे सात विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**



सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी व पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान या सोबतच विविध स्पर्धा परीक्षेत या विद्यालयाचे विद्यार्थी नेत्र दीपक प्रगती करताना दिसत आहेत. या परीक्षेत इयत्ता आठवीतील कु. सृष्टी वायचाळ,हनुमान जाधव, शुभम पडोळे,सोहम पडोळे, कु.कनिष्का चोंढेकर, कु.राधिका अंभोरे, कृष्णा पडोळे तर इयत्ता पाचवीतील अनुराग रणवीर.

हे विद्यार्थी शिष्यवृत्ती करीता पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना विनोद शिंदे, संगीता जाधव, जागृती गोरे, प्रवीण राऊत, तुलसीदास चिलमूल, सितराम जोंधळे, या अध्यापक महोदयांनी मार्गदर्शन केले.याबद्दल शाळेत सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणारे अध्यापक यांचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश स.अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसीदास चिलमूल यांनी सत्कार केले. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# नांदेड परिक्षेत्र कार्यालय राज्यात द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यालयांना १०० दिवसांचा सात कलमी सुधारणा कार्यक्रम आखून दिला होता. यात नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

या कार्यक्रमांतर्गत शंभर दिवसांची मुदत संपल्यानंतर परिक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कामगिरीचे मुल्यमापन प्रथम पोलिस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात आले. त्यात ३ परिक्षेत्रीय कार्यालयाची निवड करण्यात आली होती. दि २४ एप्रिल रोजी भारतीय गुणवत्ता परिषद यांनी नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला होता. परिक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कार्यालयीन सुधारणा, परिक्षेत्रीय कार्यालयापासून थेट पोलिस ठाण्यांपर्यत सुरू केलेली ई टपाल व्यवस्था, गुन्हे अभिलेखांचे संगणकीकरण करून तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली इगल आय क्राइम इन्व्हीस्टीगेशन मॉनीटरींग ही प्रणाली, विविध प्रकरणांत नागरिकांना शिघ्रेतेने सेवा देण्यासाठी सुरू केलेली कालबध्द निर्गती मोहीम, ग्राम पातळीवर नागरिकांच्या सहभागातून सुरू केलेली व्यसनमुक्त गांव मोहीम, उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पातळीवर सुरू केलेली तक्रार निवारण केंद्र, पोलिस ठाणे पातळीवर राबवलेले तक्रार निवारण दिन आदी कामकाजाची परिषदेने दखल घेतली होती. त्यानंतर भारतीय गुणवत्ता परिषदेने निकाल घोषित केला. त्यामध्ये राज्यातील सर्व पोलिस परिक्षेत्रातून द्वितीय येण्याचा मान नांदेड परिक्षेत्राला मिळाला आहे. कार्यालयातील पोलिस अधिकारी, अंमलदार, कर्मचारी यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच सदरचे यश मिळाले अशी प्रतिक्रीया पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिली आहे.

# राजू भैय्या सेवा प्रतिष्ठानच्यावतीने ७ मे ते १० मे वसुमती महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**



राजू भैया सेवा प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या पंचवीस वर्षापासून वसमत विधानसभा मतदारसंघामध्ये सामूहिक विवाह सोहळे, आरोग्य विषयक शिबिरे, विद्यार्थ्यांचे गुणगौरव सोहळे, स्पर्धा परीक्षा, विद्यार्थ्यांच्या विविध परीक्षा, कृषी क्षेत्राशी निगडित, सामाजिक आणि इतर सर्व क्षेत्रांमध्ये कार्य केले जात आहेत.

या वर्षी २०२४-२०२५ मध्ये विस्तृत भर घालून आमदार राजु भैया नवघरे यांनी सेवा प्रतिष्ठानच्या वतीने वसमत विधानसभा मतदारसंघातील सामाजिक, शैक्षणिक, डॉक्टर, इंजिनियर, वकील, साहित्यिक या सर्व क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र करून वसुमती महोत्सव समितीची स्थापन करून दरवर्षी या समितीच्या वतीने सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. याच धर्तीवर पहिल्या वर्षात खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दि. ०७ मे रोजी सायंकाळी ०७:०० वाजता थोर साहित्यिक विचारवंत सकाळ पुरवणी मध्ये फिरस्ती या नावाने प्रसिद्ध असणारी माननीय उत्तम कांबळे सर यांचे व्याख्यान होईल. दि ०८ मे रोजी बलभीम मातरे यांचे लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर व्याख्यान होणार आहे.

दि ९ मे रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये आरोग्य, शिक्षण, साहित्य, सामाजिक. अध्यात्मिक, कृषी विषयक, नैतिक राजकारण, क्रीडा, महिला सक्षमीकरण, आदर्श शिक्षक इत्यादीना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

शेवटी दहा मे २०२५ सायंकाळी ०७:०० वाजता जिल्हा परिषद प्रशाला मैदान वसमत या ठिकाणी आनंद शिंदे यांचा गीत गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे हे सर्व कार्यक्रम रात्रीचे असून सुरुवातीचे तीन कार्यक्रम नगरपरिषदेचे चौगुले सभागृह वसमत या ठिकाणी होतील आणि शेवटचा कार्यक्रम १० मे रोजी जिल्हा परिषदेच्या मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमासाठी वसुमती समिती मधील सर्व सभासद यांचे योगदान लाभणार आहे. यामध्ये शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, डॉक्टर, इंजनियर साहित्यिक आदी सहभागी राहणार आहेत. वसमत आणि परिसरातील सर्व श्रोत्यांनी आणि विचारवंतांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार राजू भैया नवघरे यांनी केले आहे.

# जिल्ह्याचा बारावीचा निकाल ८८.५४ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मे**

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या सन २०२५ च्या बारावीचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून यामध्ये हिंगोली जिल्ह्याचा निकाल ८८.५४ टक्के इतका लागला आहे. यावेळीही मुलींनींच निकालात बाजी मारली आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये बारावीच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. जिल्ह्यात ४० परीक्षा केंद्रांवर १३ हजार ५४१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ११ हजार ९९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची टक्केवारी ८८.५४ एवढी आहे. जिल्ह्यातून ७३१३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ६१९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर ६२२८ विद्यार्थीनी यावर्षी परीक्षेला बसल्या होत्या त्यापैकी ५७९९ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे निकालात उत्तीर्णतेचे प्रमाण मुलींचेच जास्त आहे.

दरम्यान, जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियानांतर्गत परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्रांवर चाळीस बैठे पथक स्थापन केले होते. तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. शिवाय अधिकाऱ्यांचे पथके वेळोवेळी परीक्षा केंद्राना भेटी देत होते. गतवर्षी बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला होता.

# गरजु रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा तात्काळ पुरवा : आ. आनंद बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०५ मे-**

विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना तातडीच्या आणि दर्जेदार आरोग्यसेवा पुरावा अन्यथा कोणाचीही गैर केली जाणार नाही अशा इशारा देत आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी रुग्णालयाच्या प्रशासनास धारेवर धरले.

विष्णुपुरी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी शासकीय रुग्णालयातील कामकाजाचा आढावा दिनांक ३ मे २०२५ रोजी आ.बोंढारकर यांनी एका आढावा बैठकीद्वारे घेण्यात आला. या आढावा बैठकीत रुग्णालयातील असुविधांवरूनही त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. नांदेड शहरा लगत असलेल्या विष्णुपुरी येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील सुविधांबद्दल रुग्ण आणि नातेवाईकांमधून मोठी नाराजी व्यक्त होत होती. येथील अस्वच्छता , पिण्याचे पाण्याची व्यवस्था



, बंद असलेली एमआरआय मशीन , सिटीस्कॅन आणि अन्य सुविधांबाबतही मोठी ओरड होत असताना दिनांक ३ मे रोजी आ.बोंढारकर यांनी विष्णुपुरी रुग्णालयाच्या प्रशासनाची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी रुग्णालय प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले . रुग्णालय परिसरामध्ये कोणत्याही प्रकारे रुग्णांची हेळसांड होणार नाही . त्यांची लुटमार होणार नाही. त्यांना योग्य आरोग्य सेवा जागेवर मिळतील . यासाठी रुग्णालय प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अन्यथा संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची खैर केली जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे. रुग्णालयामध्ये बंद असलेल्या सर्व यंत्रणा तात्काळ कार्यान्वित कराव्यात. त्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही मात्र रुग्णालय प्रशासनाने कोणत्याही कारणास्तव रुग्णांना कोणत्याही आरोग्य तपासणीसाठी बाहेर पाठवणार नाहीत. याची काळजी रुग्णालय प्रशासनाने घ्यावी असे निर्देशही आ. बोंढारकर यांनी यावेळी दिले.यावेळी

अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख,वैद्यकीय अधीक्षक डॉ.कापसे,नियोजन अधिकारी डॉ. डोळे,शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,शहरप्रमुख तुलजेश यादव,शहरप्रमुख सुहास खराणे पाटील,तालुकाप्रमुख अशोक मोरे,रवि थोरात यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुखांची उपस्थिती होती.

# जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून विकास कार्य गतिमान करू : खा. डॉ. अजित गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०५ मे-**

राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून सर्वसामान्यांचा विकास साधण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने आगामी काळात विकास कामे पूर्ण होतील असा विश्वास खासदार अजित गोपछडे यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच संपन्न झालेल्या नांदेड जिल्हा प्रशासन विकासकार्य आढावा बैठकीत खा. डॉ. गोपछडे बोलत होते. लोकांच्या अनेक प्रश्नांची माहिती घेऊन प्रशासनास अवगत केले. कडक उन्हाळ्यामुळे नांदेड शहरातील आणि जिल्ह्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची सूचना केली.

ग्रामीण भागात सध्या खरीप हंगामाची पूर्व तयारी चालू झाली आहे. जिल्हा प्रशासनाकडून शेतकरी बांधवांना योग्य वेळी मदत व्हावी म्हणून जिल्ह्यातील मालगुजारी तलावातला गाळ तात्काळ काढावा यासाठी मनरेगा आणि लोकसहभागातून ही कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावेत.तसेच शहरी भागात नालेसफाई चे काम वेळेत पूर्ण करावेत. पावसाळ्यात वृक्षारोपण योजनेत सर्व वयोगटातील नागरिकांना सहभागी करावे. मातृवंदन योजना, आयुष्मान आरोग्य मंदिर, अंगणवाडी, आशा सेविकांचे प्रश्न सोडविणे, कुपोषण मुक्ती बाळासोबत आईची पण झाली पाहिजे, बालिका शिक्षण बसव्यवस्था दुरुस्त करावी, बालिका पंचायत व्यवस्थेस प्रोत्साहन देणे,पूण्यश्लोक अहिल्यादेवी त्रिशताब्दी निमित्त महिला सक्षमीकरण आणि सर्वांगीण उन्नती, प्रधानमंत्री सूर्य घर योजना, गोदावरी शुद्धिकरण, नांदेड शहरातील रहदारी समस्या उपाययोजना, आगामी २० वर्षासाठी होलीसिटी सर्वांगीण विकास आराखडा, जिल्हा परिषद नवीन इमारत मिनी सचिवालय बांधकाम प्रस्ताव तयार करणे, जीर्ण झालेल्या पोलीस वसाहतींचे बांधकाम, आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करणे, तरोडेकर चौक ते मुथा चौक फ्लायओवर तयार करणे, कैन्सर, मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल निर्माण, कायदा सुव्यवस्था याबाबतीत अनेक उपयुक्त दिशानिर्देश जिल्हाप्रशानास दिले.

खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी १०० दिवसीय प्रशासकीय मूल्यमापनात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त महेश डोईफोडे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. खंडेराय धरणे यांचे शाल देऊन विशेष अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. प्रशासकीय मुल्यांकनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व विभागांचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे देखील विशेष अभिनंदन केले.

## रहाटकरांच्या कवितेची निवड

**आदमपूर**-सातारा जिल्ह्यातील कराड येथे होत असलेल्या ३१ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात नांदेड जिल्यातील ग्राम दगडगांव येथील कवी साईनाथ रहाटकर यांची निमंत्रीत कविसंमेलनात निवड झाली आहे.

## थडीसावळीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**आदमपूर-** बिलोली तालुक्यातील ग्राम थडीसावळी नवीन येथे बुधवार दि.३० एप्रिल पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाले आहे. येथील अखंड हरिनाम सप्ताह थडीसावळी गाव परिसरात दरवर्षीप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण असते. दि.३० एप्रिल पासून क्रमाने ह.भ.प.रामगिरी महाराज कलगांवकर, ह.भ.प.कु.प्रतिक्षाताई निवळीकर,ह.भ.प.सुनिताताई चांडोळकर, ह.भ.प.आरतीताई कावरे बोरीकर, ह.भ.प.अरविंद महाराज सोनखेडकर, ह.भ.प.प्रणव महाराज भोकरकर, ह.भ.प.लक्ष्मण महाराज भेंडेगावकर,अखेर बुधवार दि.७ मे रोजी प्रती इंदूरीकर ह.भ.प.शिवाजी महाराज देशमुख यांच्या उपस्थितीत काल्याचे किर्तन हा कार्यक्रम महाप्रसाद वाटप करून संपन्न होणार आहे. अन्नदान, महाप्रसाद अनुक्रमे व्यंकट सानेबाईनवाड,मारोती मठपती,संतोष बोगुलवार,रितेश चौहाण, गंगासिंह ठाकूर,शंकरसिंह ठाकूर,लिंगुराम सानेबोईनवाड, नरसिंग सानेबोईनवाड, अशोक हांद्रे, युवराजसिंह चौहाण,विठ्ठल सानेबोईनवाड,शिवाजीसिंह ठाकूर, व्यंकट वल्लेमवाड,सतिश बोगुलवार, राजुसिंह चौहाण, सुरेश नाईक,लक्ष्मण सानेबोईनवाड, लक्ष्मण सिदमलवाड,गुमानसिंह ठाकूर,मारोती बोगुलवार,गंगासिंह ठाकूर,गोविंद सानेबोईनवाड यांच्यावतीने भक्तगणांस आयोजित केले आहे.

## कुंडलवाडी येथे माता श्री वासवी जयंती उत्सव

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि. ०५ मे-**

कुंडलवाडी येथे श्री वासवी कन्यका परमेश्वरी माता जयंती उत्सव दि.७ मे रोजी आयोजीत करण्यात आले आहे.

कुंडलवाडी येथील आर्य वैश्य समाजाच्या वतीने दर वर्षी प्रमाणे या हि वर्षी श्री वासवी कन्यका परमेश्वरी माता जयंती उत्सव श्री राम मंदिर कुंडलवाडी येथे दि.७ मे रोजी साजरी करण्यात येत असून सकाळीं ९.३० वा. श्री वासवी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात होणार असुन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व समाज बांधवांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष जयप्रकाश कमटलवार व आर्य वैश्य समाज महिला अध्यक्षा सौ.सुनीता बेजगमवार व सर्व कार्यकारणीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### नरसी येथे वासवी माता कन्यका परमेश्वरी मंदिराचा भूमिपूजन सोहळा

**नायगाव** -नरसी येथील सकल आर्य वैश्य समाज बाधवांच्या वतीने वासवीमाता कन्यकापरमेश्वरी मंदिराचा भव्यभूमी पूजन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. तालुक्यातील नरसी येथे नव्यानेच उभारण्यात येणाऱ्या वासवी माता कन्यका परमेश्वरी मंदिराच्या भव्य निर्मितीचा संकल्प सकल आर्य वैश्य समाज बाधवाच्या पुढाकारातून केला जाणार आहे. त्या अनुषंगानेच नरसी येथील जिगळा परिसरात मंदिर बांधकामाचा भूमिपूजन सोहळा सकल आर्य वैश्य महासभे चे सर्व पदाधिकारी व नरसीतील सकल आर्य वैश्य समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीत दि.३० मार्च रोजी सायंकाळी नरसी येथील संदीप महाराज जोशी यांच्या मंत्रोच्चारा मध्ये भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. नरसीत सकल आर्य वैश्य समाज बांधवांच्या वतीने प्रथमच साकारण्यात येणाऱ्या वासवी माता कन्यका परमेश्वरी मंदिरामुळे नरसीच्या धार्मिक वैभवात भर पडणार असून.यावेळी आर्य वैश्य समाजा कडून मान्यवरांचे स्वागत केले.या भूमिपूजन सोहळ्या प्रसंगी आर्य वैश्य महासभेचे गोविंद बिडवई, सदानंद मेडेवार, बिपीन गादेवार,बालाजी चिंतावार,शंतनूकोटगिरे,गोविंद पोलावार, प्रदीप मनाठकर, नागेश चिंतावार, गोपाळकृष्ण मुनगिलवार, विठ्ठल चिद्रावार,गजानन चौधरी,पवन गादेवार,नवनाथ कवटिक वार, राजेश काप्रतवार, सुमित लाभशेटवार,चंद्रकांत काचमवार सह आदि समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### दत्ता भिसे यांच्या नवीन वास्तूचा गृहप्रवेश सोहळा थाटात

**किनवट** - आमदार भीमराव केराम यांचे अत्यंत विश्वासू, खंदेसमर्थक तथा गोकुंदा ग्रामपंचायतचे सदस्य दत्ता भिसे यांच्या नवीन घराचा गृहप्रवेश सोहळा थाटामाटात साजरा झाला असून यावेळी आमदार भीमराव केराम यांच्या शुभहस्त फीत कापून भिसे कुटुंबाने गृहप्रवेश केला. गेल्या कित्येक वर्षापासून तरुण तडफदार युवा नेते दत्ता भिसे हे राजकीय व सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.आमदार भीमराव केराम यांचे ते अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून सर्वत्र परिचित आहेत.गोकुंदा ग्रामपंचायतचे सदस्य या नात्याने त्यांनी आ. केराम यांच्या नेतृत्वाखाली गोकुंदा येथे पायाभूत विकासासाठी लाखो रु चा निधी खेचून आणला. दरम्यान दत्तनगर भागात दत्ता भिसे यांनी नवीन वास्तू उभारली असून दिनांक ३० एप्रिल रोजी या नवीन घराचा गृहप्रवेश सोहळा थाटामाटात साजरा झाला.यावेळी आमदार भीमराव केराम यांच्या शुभहस्ते फीत कापून दत्ता भिसे यांच्या परिवाराने गृहप्रवेश केला आहे. याप्रसंगी युवानेते अॅड.प्रतीक केराम माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,भाजपा उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत कराळे, राकेश बोंपीलवार,रवि चव्हाण, श्याम मगर, सरपंच अनिल डूडुळे,शंकर मानकर धीरज ठाकूर, गणेश धोटे, भारत सिरडे, पंजाब धुमाळे,आकाश जोशी, दीपक डवरे, बालाजी मडावी, गजानन मासटवार, मारोती मुकाडे, देवराव खुडे आकाश वानोळे,जलसंपदा कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच दत्ता भिसे यांच्या परिवारातील नातेवाईक व आप्तइष्ट,मित्रपरिवार व गोकुंदा येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नारायणा इंटरनॅशनल स्कूल अॅण्ड कॉलेजचा १२वी परिक्षेचा १०० टक्के निकाल

**लोहा**-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी आज दुपारी परीक्षेचा निकाल जाहिर झाला, त्यामध्ये नारायणा इंटरनॅशनल स्कूल अॅन्ड ज्यु. कॉलेजने घवघवीत यश संपादन करुन त्यामध्ये कु. केंद्रे गायत्री विजय या विद्यार्थ्यांनी ८१ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये पहिला येण्याचा मान मिळवला आहे. नारायणा इंटरनॅशनल ज्यु कॉलेजचा इयत्ता १२ वी चा १०० टक्के निकाल लागला आहे. या परिक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत यशाची परंपरा कायम ठेवली त्यामध्ये कु बोंडारे संयोगीता व्यंकटी ७७.१७ टक्के, गायकवाड सृष्टी नागनाथ ७६.८३ टक्के, डोम शुभांगी गंगाधर ७६.१७ टक्के, गायकवाड प्रतिक्षा अशोक ७४.८३ टक्के, जायभाये पुनम शिवराम ७४.८३ टक्के, ढगे संतोष संभाजी ७३.५० टक्के, जिरेवार सृष्टी प्रकाश ७१.१७ टक्के, खान सालेहा खानम खुर्शीद अहेमद खान ७०.६७ टक्के, कदम आदित्य अरुण ७०.१७ टक्के, चव्हाण शुभम रंगनाथ ७०.०० टक्के, कदम चंदना मनोहर ७०.०० टक्के, रहाटकर दिव्यश्री बालाजी ६९.८३ टक्के, कुन्हे साईराम गंगाधर ६९.५० टक्के, गित्ते शंतनु गोविंद ६८.६७ टक्के, गवारे मृनाली कालिदास ६८.५० टक्के, बच्चेवार संचिता संतोष ६८.१७ टक्के, जिगळे ऋषिकेश पांडूरंग ६६.६७ टक्के, पारदे यश सुनिल ६६.६७ टक्के, भगत सुजल नारायण ६६.५० टक्के, मारपल्ले शिवलिंग कार्तिक ६५.५० टक्के, डमरे रविराज मोहनराव ६५.१७ टक्के, मोळके विजय रघोजी ६५.१७ टक्के, घेउन गुणवंतांच्या यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष नारायणराव मुंडे, नारायणा इंटरनॅशनल स्कूल अॅन्ड ज्यु. कॉलेजचे प्राचार्य शिवाजी केंद्रे,कोरकमेटीचे नामदेव केंद्रे व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# माता वासवी जन्मोत्सव निमित्त भव्य शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०५ मे-**

सामाजिक प्रकल्पात सदैव आघाडीवर असलेल्या येथील आर्य वैश्य परिवार मंडळ कौठा च्यावतीने आर्य वैश्य कुलस्वामिनी माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सवानिमित्त बुधवार, दि. ७ मे रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिव रितेश अमिलकंठवार, कोषाध्यक्ष सचिन काशेटवार आणि शोभा यात्रा प्रमुख योगेश बारडकर यांनी दिली.

श्री बालाजी मंदिर विकासनगर, कौठा येथून दुपारी ४ वाजता शोभायात्रेला प्रारंभ होणार असून हॉटेल आकृती, महात्मा बसवेश्वर पुतळा, लातूर फाटा मार्गे वासवी माता मंदिर सिडको रोड येथे समारोप होणार आहे.

उद्घाटनप्रसंगी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासभा उपाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी खा. अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे, नंदकुमार गादेवार, दिलीप कंदकुर्ते, महासभा महासचिव गोविंदराव बिडवई, एकनाथराव मामडे, अनिल मनाठकर, महासभा कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन यांच्या शुभहस्ते महाआरती संपन्न होणार आहे. भव्य शोभायात्रेत बागेश्वर धाम सेवा समिती, सत्संग भजन मंडळाचे व नाद अस्त्र ढोल ताशा पथकाचे विशेष आकर्षण असणार आहे. शोभायात्रेचे विविध सामाजिक संस्थांकडून ठिकठिकाणी स्वागत होणार आहे.

तरी माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सव भव्य शोभायात्रेत सर्वांनी सहपरिवार सहभागी होऊन वासवी मातेच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य वैश्य परिवार मंडळ कौठा व माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अबब ...चक्क स्मशानभूमीत दिपोत्सव

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ०५ मे-**



शहरातील स्मशानभूमीत १मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलित करण्यात येऊन एक आगळावेगळा दिपोत्सव जागर स्वच्छतेचा सामाजिक संघटनेच्या वतीने साजरा करुन मृत आत्म्यास शांती लाभावी म्हणून २ मिनिटे शांतता पाळुन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली व विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सुर्यवंशी , पोलिस निरीक्षक मारोती मुंडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, माजी नगरसेवक वाय.जी. सोनकांबळे युवा सेना चे मा श्री राहुल सोनकांबळे, कैलास येसगे, संतोष उनगृतवार , कु.भावना नंदकिशोर दाशेटवार यांच्यासह अनेक पुरुष व महिलां भगिनी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

सदरील कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी सत्यनारायण नागोरी, सत्यनारायण सुवर्णकार, विजय यन्नावार आदींनी परिश्रम घेतले.

# माहूर शहर व ग्रामीण भागासाठी दोन शववाहिका उपलब्ध करून द्या : नगराध्यक्ष दोसानी

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ०५ मे-**

माहूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात कोणत्याही प्रकारची मृत्यूची दुःखद घटना घडल्यानंतर मृतदेह रुग्णालयापासून घरापर्यंत तसेच स्मशानभूमीपर्यंत नेण्यासाठी शववाहिका नसल्याने शोकाकुल परिवाराची अत्यंत दयनीय अवस्था होऊन जाते. त्यांची होणारी ही मानसिक कुचंबणा थांबवी म्हणून माहूर शहरासाठी १ व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय स्तरावर १ अशा २ शववाहिका उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा आशयाची मागणी माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी मुख्य कार्यकरी अधिकारी मेघना कावली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्याकडे नांदेड कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनाद्वारे केली.

निवेदनात पुढे लिहिले आहे कि,जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला असलेले माहूर शहर व अतीदुर्गम डोंगराळ भागात वसलेल्या जवळपास १०० गावात आरोग्य सेवा जेमतेम स्वरुपात उपलब्ध आहेत.शासकीय वा खाजगी रुग्णालयात रुग्णाचा मृत्यू झाल्यास रुग्णालय ते घर वा तेथून अंत्यविधीसाठी स्मशानभूमीपर्यंत मृतदेह वाहून नेण्यासाठी शववाहिके अभावी दुःखद घटना घडलेल्या शोकाकुल परिवाराला याप्रसंगी मोठी कसरत करावी लागते.



अनेकवेळा मृतदेह वाहून नेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होताना दिसून येते. आजही ग्रामीण भागात एखाद्या व्यक्तीचा रुग्णालयात मृत्यू झाल्यास मृतदेह खाजगी वाहन वा बैलगाडीमधून न्यावा लागत असल्याचे अत्यंत दयनीय आणि करुन चित्र आहे. ग्रामीण भागात मृतदेह वाहून नेण्यासाठी फारशी व्यवस्था नसल्यामुळे लोकांचे होणारे हाल लक्षात घेऊन माहूर शहरासाठी १ व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय स्तरावर १ अशा २ शववाहिका उपलब्ध करून द्याव्यात अशी विनंतीवजा मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नगराध्यक्ष दोसानी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी त्यांचे सोबत अहेमद कुरेशी, शेख सलीम शेख कलीम, सयद आरिफ, आसिफ फर्जल्ला, फैजूला खान पठाण, इसाक भाई, उपस्थित होते.

# भोकर शहरात खूलेआम मटका; संबधिताचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ०५ मे-**

शहरात खूलेआम मटकाजूगार चालू असून याकडे संबधित यंत्रणेचे अक्षम्य दूर्लक्ष होत आहे.

बसस्थानक परिसर व रेल्वेगेट परिसरात मटका जूगार खूलेआम चालू असून बेरोजगार यूवक या जूगाराच्या नादी लागून बर्बाद होत आहेत संबधित विभागास या मटका जूगार चालू असल्याची कल्पना नसेल तर नवलच म्हणावे लागेल मटका चालक व संबधित यंत्रणेचे अर्थिक हितसंबध असल्यानेच हा जूगार खूलेआम सूरु असल्याची चर्चा आहे तसेच राजनिवास मूसाफिर सागर आदि नावाचा गूटखा देखील सर्रास विक्रि होतो गूटखा विक्रिवर बंदी असताना शासनाच्या बंदिला झूगारुन खूलेआम गूटख्याच्या पूड्या पानटपरीवर सहज उपलब्ध होत असताना अन्न सूरक्षा अधिकारी दर महिन्याला गूटखा विक्रेत्याची विशेष अर्थीक भेट घेवून जात असल्याची जोरदार चर्चा शहरात असून गूटखा व मटका जूगार हा व्यवसाय करणारे संबधित विभागाशी अर्थिक हात मिळवणी करुन सर्व काही अलबेल चालू असून याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणे गरजेचे आहे.भोकर शहरात अवैद्य प्रवाशी वाहतूक मोठ्या प्रमाणात सूरु असून क्षमतेपेक्षा जादा प्रवाशी घेवून वाहने भरधाव वेगाने धावतात या गंभीर प्रकाराकडे संबधिताचे दूर्लक्ष असून अतिवेगाने वाहने चालवित असल्याने अनेक अपघाताच्या घटना घडत आहेत किनवट रोड नांदेड रोड वर अवैद्य प्रवाशी वाहतूक करणारी वाहने तासन तास उभी राहतात रस्त्याने ये जा करणाऱ्या सामान्य नागरीकांना याचा त्रास होतो रस्त्यात वाहने उभी करीत असल्याने वयोवृध्द महिलांना याचा त्रास सोसावा लागतो अवैद्य मटका जूगार प्रतिबंधित गूटखा अवैद्य प्रवाशी वाहतूक करणारे वाहनधारकांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्वस्तरातून होत आहे.

# एसजीजीएस अभियांत्रिकी तंत्रशास्त्र संस्थेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०५ मे-**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेमध्ये बी.टेक. (केमिकल इंजिनिअरिंग) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ बॅचमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थे विष्णुपुरी येथे दिनांक २१ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळा सहत पार पडला या विशेष कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मोहित जी. जाजू (संचालक, गोदावरी ड्रग्स लि., नांदेड), जयंत जोगाईकर (उपाध्यक्ष) आणि गिरीश देशपांडे (मानव संसाधन व्यवस्थापक) उपस्थित होते. संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. एस. बी. देठे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. ए. बी. गोंडे, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. ए. व्ही. नांदेडकर, प्रबंधक डॉ. ए. आर. पाटील, केमिकल विभाग प्रमुख डॉ. प्रकाश जाधव तसेच प्राध्यापक डॉ. ए. डब्ल्यू. देशमुख, डॉ. एस. बी. मुंढे, डॉ. ए. पी. चव्हाण, प्रा. पी. ए. पवार आणि प्रा. डी. यू. गिराम यांचीही उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पी. जी. जाधव यांच्या प्रस्तावनेने झाली. त्यांनी शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील भागीदारी प्रगतीला चालना देत असल्याचे आणि खऱ्या आयुष्यातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी प्रेरणा देत असल्याचे नमूद केले. तसेच गोदावरी उद्योग समूहाने ही पारितोषिके देऊन रसायन अभियांत्रिकेतील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. तसेच इतर उद्योग समूहांनी अशाच उपक्रमांसाठी समोर येण्यासाठी गरज आहे. असे आवाहन यावेळी डॉ. प्रकाश जाधव यांनी केले.

प्रमुख पाहुणे मोहित जाजू यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या गरजेवर भर दिला. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो, असे प्रतिपादन केले. या गौरव समारंभात सुवर्णपदक विजेती कु. श्रुती सिंग, रौप्यपदक विजेती कु. पूर्वा वैद्य आणि कांस्यपदक विजेते अनिकेत चॅटर्जी यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार १० हजारच्या धनादेशासह प्रमाणपत्र व पदक प्रदान करण्यात आले. ही पारितोषिके गोदावरी ड्रग्स लि., नांदेड यांच्या सौजन्याने प्रायोजित करण्यात आली होती.

डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा संक्षिप्त आढावा घेतला. त्यांनी पदवीधरांना केवळ कुशल अभियंतेच नव्हे, तर जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनण्याचे आवाहन केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. ए. व्ही. नांदेडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, तुमची खरी यात्रा आता सुरू झाली आहे. इथे मिळवलेली मूल्यं, ज्ञान व शिस्त यांना सोबत घेऊन जा आणि तुमच्या व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात सतत प्रगती करत राहा.

प्रा. एस. बी. देठे यांनीही विद्यार्थ्यांना संबोधित करताना आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगजगताच्या गरजेनुसार स्वतःला घडवण्याचे व नवकल्पनांना वाव देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस त्यांनी प्रमुख पाहुणे, शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.